# निवडक शोधनिबंध
# फेब्रुवारी २०२५

संपादक

प्रा. डॉ. गोवर्धन दिकोंडा

कागद प्रकाशन

ISBN 978-93-342-3008-6

# निवडक शोधनिबंध फेब्रुवारी २०२५

## (ई-बुक)

संपादक

**प्रा. डॉ. गोवर्धन दिकोंडा**

एम. ए., नेट-जेआरएफ, पी.एचडी. (इतिहास – विना मार्गदर्शक)

**कागद प्रकाशन, सोलापूर.**

# निवडक शोधनिबंध फेब्रुवारी २०२५
## संपादक - प्रा. डॉ. गोवर्धन दिकोंडा

ISBN 978-93-342-3008-6

**प्रकाशक** :
**कागद प्रकाशन, सोलापूर**
१०२ डी ११२, घोंगडे वस्ती, भाजी मार्केट जवळ, भवानी पेठ, सोलापूर – ४१३००२.
भ्रमणध्वनी – ९०२११२०७३३६, ईमेल – govardhan.docs@gmail.com

**© प्रा. डॉ. गोवर्धन दिकोंडा**

**(E-Book / ई-बुक) फेब्रुवारी, 2025**

**अक्षरजुळणी :**
संपादक – प्रा. डॉ. गोवर्धन दिकोंडा, सोलापूर.

**कॉपीराईट © २०२५, प्रा. डॉ. गोवर्धन दिकोंडा**

सर्व हक्क राखीव. या प्रकाशनाचा कोणताही भाग लेखकाच्या पूर्व लेखी परवानगीशिवाय फोटोकॉपी, रेकॉर्डिंग किंवा इतर इलेक्ट्रॉनिक पद्धतींसह कोणत्याही स्वरूपात पुनरुत्पादित, वितरित किंवा प्रसारित केला जाऊ शकत नाही, तसेच पुनरावलोकनांमध्ये मूर्त स्वरूपातील संक्षिप्त कोटेशन आणि कॉपीराइट कायद्याद्वारे परवानगी असलेल्या काही इतर गैर-व्यावसायिक वापराशिवाय कोणालाही वापर करता येत नाही.

किंमत : **₹ १००/-**

# निवडक शोधनिबंध फेब्रुवारी २०२५

## अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | **साहित्य समीक्षा : पद्धती आणि कार्ये -** प्रा.अंकुश भारत घुले | 1-12 |
| २. | **ना.धों.महानोर यांचे मराठी ग्रामीण कवितेतील योगदान** - डॉ.महेश रणदिवे | 13-25 |
| ३. | **भारतीय समाजात स्त्रीचे होणारे शोषण** - प्रा. ठाणेकर बाळाताई महेंद्र | 26-31 |
| ४. | **भटके विमुक्त स्त्रियांचे वर्तमान** - प्रा. विनायक विलास सरदेसाई | 32-40 |
| ५. | **भारतातील डाक व्यवस्था : इसवी सन पूर्व ६ वे शतक ते इसवी सन १९५० -** प्रा. डॉ. गोवर्धन कृष्णाहरी दिकोंडा | 41-47 |
| ६. | **भौगोलिक माहिती प्रणालीचे भूगोलातील उपयोजन** - प्रा.डॉ. राघवेंद्र ताटीपामूल | 48-53 |

# साहित्य समीक्षा : पद्धती आणि कार्ये

प्रा.अंकुश भारत घुले
राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज,
कोल्हापूर.
भ्रमणध्वनी: ७७४५८८८४१३

➢ **घोषवारा :-**

समीक्षा म्हणजे साहित्यकृतीच्या गुणदोषांचे परीक्षण करून मूल्यमापन करणे होय. मराठीतील 'समीक्षा' हा शब्द 'सम+ईक्ष' या दोन पदांनी बनलेला आहे. याचा अर्थ याठिकाणी सम म्हणजे 'सर्व बाजूनी' आणि ईक्ष म्हणजे 'पाहणे' असा होतो. म्हणजेच साहित्यकृतीच्या सर्व बाजूनी पाहणे म्हणजे 'समीक्षा' होय. साहित्यकृतीचा चिकित्सक अभ्यास तीच्या माध्यमातून केला जातो. समीक्षेची नेमकी संकल्पना समजून घेण्यासाठी आपणाला अभ्यासकांनी केलेल्या व्याख्यांचा आधार घ्यावा लागेल. प्रस्तुत शोध निबंधाच्या माध्यामतून साहित्याच्या महत्त्वपूर्ण समीक्षा पद्धतींची ओळख करून घेण्यात येणार आहे. याबरोबरच साहित्य समीक्षेच्या विविध पद्धती व त्यांची वैशिष्ट्ये ज्ञात होतील. साहित्य समीक्षेचे स्वरूप समजावून घेऊन साहित्य समीक्षेच्या विविध अभ्यासकांनी केलेल्या व्याख्या समजावून घेण्याचा प्रयत्न केला आहे. साहित्य समीक्षेच्या पाश्चात्त्य व भारतीय अभ्यासकांनी केलेल्या व्याख्यांचा आढावा घेतला जाणार आहे. प्रस्तुत व्याख्यांच्या माध्यामतून साहित्य समीक्षेचे स्वरूप व कार्य स्पष्ट होण्यास मदत होणार आहे.

➢ **प्रस्तावना :-**

साहित्य आणि समीक्षा यांचे अतूट असे नाते आहे. साहिताच्या क्षेत्रात समीक्षेला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. साहित्यसमीक्षेच्या माध्यमातून साहित्यकृतीचा विविध अंगांनी अभ्यास केला जातो. या अभ्यासातून समीक्षक साहित्यकृतीवर आपले मत व्यक्त करीत असतो. यालाच आपण टीका असे म्हणतो. ही

ISBN 978-93-342-3008-6

टीका लेखकाप्रमाणेच वाचकाच्या दृष्टीनेही महत्त्वाची असते. तीचा आणि लेखकाचा, वाचकाचा, समाजाचा, वास्तवाचा, इतिहासाचा, मूल्यांचा अनुबंध समीक्षक आपल्या समीक्षेच्या माध्यमातून तपासत असतो. तसेच त्या विशिष्ट साहित्यकृतीचा विषय, आशय, अर्थ, संरचना, रूपबंध, भाषा, विचारप्रणाली, तत्त्वज्ञान, जीवनदृष्टी इ. घटकांचाही विचार समीक्षेच्या माध्यमातून केला जातो. या अर्थांनी साहित्यकृतीची समीक्षा ही त्या साहित्यकृतीच्या विविध अंगांनी केली जाते.

साहित्यासमीक्षेत साहित्यकृतीचा लेखक कोण आहे? स्री किंवा पुरुष, तो कोणत्या समाजातून आला आहे? त्या समाज्याची आर्थिक स्थिती कशी आहे? तो कोणत्या काळात लेखन करतो आहे? त्याचा वाचक वर्ग कोणता आहे? इ.चा विचार होतो. या सर्व भूमिकेतून साहित्याच्या क्षेत्रात समीक्षेला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. म्हणून प्रस्तुत शोधनिबंधातून साहित्यसमीक्षेची संकल्पना, स्वरूप व कार्ये जाणून घेणार आहोत.

## ➢ **विषयविवेचन :-**

'समीक्षा' ही साहित्यकृतीचा अर्थ विशद करीत असते. म्हणजेच त्या साहित्यकृतीचा नेमका अर्थ वाचकापर्यंत पोहोचवत असते म्हणून ती वाचकांना मार्गदर्शक ठरते. त्याचबरोबर ती साहित्यकृतीचे वस्तुनिष्ठपणे मुल्यमापनही करते. ही समीक्षा विविध प्रकारे केली जाते. त्यामुळे साहित्यकृतीला देखील योग्य न्याय मिळतो. त्यामुळे ती लेखकालाही मार्गदर्शक ठरते. समीक्षा ही साहित्यकृतीतील वैशिष्ट्ये अधोरेखित करत असते. ती एक व्यापक संकल्पना आहे. म्हणून साहित्य कृती आणि समीक्षा यांच्यामध्ये भेद नाही, असे आपणास म्हणता येईल. म्हणून प्रस्तूत शोधनिबंधाच्या माध्यमातून साहित्यसमीक्षेची संकल्पना, स्वरूप,कार्ये समजावून घेणार आहोत.

## ➢ **साहित्यसामिक्षेची संकल्पना :-**

Criticism या इंग्रजी शब्दाला पर्याय म्हणून मराठीत 'समीक्षा' हा शब्द वापरला जातो. Criticism हा शब्द 'to criticize' पासून तयार झाला आहे. याचा अर्थ दोष काढणे, गुण - दोष विवेचन करणे, टीकेची कला,

कडक टीका असा होतो. म्हणून Criticism ला ‘समीक्षा’ हा योग्य पर्याय वाटतो. त्याचबरोबर Criticism चा व्यापक अर्थही समजतो.

मराठीतील ‘समीक्षा’ हा शब्द ‘सम+ईक्ष’ या दोन पदांनी बनलेला आहे. याचा अर्थ याठिकाणी सम म्हणजे ‘सर्व बाजूनी’ आणि ईक्ष म्हणजे ‘पाहणे’ असा होतो. म्हणजेच साहित्यकृतीच्या सर्व बाजूनी पाहणे म्हणजे ‘समीक्षा’ होय. साहित्यकृतीचा चिकित्सक अभ्यास तीच्या माध्यमातून केला जातो. समीक्षेची नेमकी संकल्पना समजून घेण्यासाठी आपणाला अभ्यासकांनी केलेल्या व्याख्यांचा आधार घ्यावा लागेल. या व्याख्यावरून समीक्षेचे स्वरूप समजण्यास मदत होईल.

➢ **पाश्चात्य अभ्यासक :-**

**१.मॅथ्यू अर्नोल्ड :-** “ कलाकृतीतील गुणांची स्तुती करणे वा एखाद्या वस्तूचे यथार्थ अवलोकन करणे म्हणजे समीक्षा होय.’’

**२.जॉन डयुई :-** “ समीक्षा म्हणजे निर्णय ’’

**३.रेने वेलेक :-** “वाङमयाचे शास्त्र म्हणजे समीक्षा ’’

➢ **भारतीय अभ्यासक :-**

**१.गंगाधर गाडगीळ :-** “साहित्याचे रसग्रहण व मूल्यमापन समीक्षेची टीका लेखनाच्याद्वारेच होते.’’

**२.प्रा.श्री.के.क्षीरसागर :-** “ कलाकृतीचा आस्वाद घेणे हाच खरा समीक्षेचा उद्देश होय.’’

**३.श्री.वा.ल.कुलकर्णी :-** “ वाङमयीन टीका हा कधी न संपणार शोध आहे.टीकेची भूमिकाही बोधकाची नसून शोधकाची असते.’’

अशा विविध व्याख्यातून समीक्षकांनी समीक्षेविषयी मते मांडली आहेत. यावरून समीक्षेची संकल्पना, स्वरूप स्पष्ट होते. वरील व्याख्यातील श्री.वा.ल.कुलकर्णी यांची व्याख्या अधिक समर्पक वाटते. कारण साहित्यकृतीची समीक्षा म्हणजे कधीही न संपणारा शोधच असतो. काळानुरूप साहित्यकृतीचा अर्थ बदलत असतो. त्याचा शोध समिक्षेक नव्याने घेत असतो.त्यातून प्रचारही होत असतो.

## ➢ साहित्यसमिक्षेचे स्वरूप :-

समीक्षा ही खूपच व्यापक संकल्पना आहे. त्यामुळे तीचे स्वरूप ही व्यापक आहे. साहित्य आणि साहित्यसमीक्षा या दोन परस्परावलंबी संकल्पना आहेत. साहित्यनिर्मितीनंतर समीक्षा लिहिली जाते. यावरून साहित्यसमिक्षेच्या स्वरूपाविषयी आपणाला काही ठळक विधाने मांडता येतील.

१. साहित्यकृतीचा नेमका अर्थ वाचकापर्यंत पोहोचवणे.

२. लेखक व वाचकाला मार्गदर्शन करणे.

३. साहित्यकृतीतील गुण-दोष दाखवणे.

४. साहित्यकृतीची योग्यता स्पष्ट करणे.

५. साहित्यकृतीचा वस्तुनिष्ठपणे अभ्यास करणे.

६. साहित्यकृतीची वाङमयीन योग्यता स्पष्ट करणे.

७. वाचकाची अभिरुची विकसित करणे.

८. साहित्यकृतीच्या चिकित्सक अभ्यासातून कलाकृतीविषयी योग्य निर्णय देणे.

## ➢ साहित्यसमिक्षेच्या पद्धती :-

साहित्यकृतीचा अभ्यास तिच्या विविध अंगानी केला जातो. त्यावरून साहित्यसामिक्षेच्या विविध पद्धती निर्माण झाल्या आहेत. या समीक्षापद्धती पुढीलप्रमाणे ;

| | |
|---|---|
| १.आस्वादक समीक्षा. | २.समाजशास्त्रीय समीक्षा. |
| ३.मार्क्सवादी समीक्षा. | ४.मनोवैज्ञानिक समीक्षा. |
| ५.आदिबंधात्मक समीक्षा. | ६.स्त्रीवादी समीक्षा. |
| ७.चरित्रात्मक समीक्षा. | ८.ऐतिहासिक समीक्षा. |
| ९.भाषाशास्त्रीय समीक्षा. | १०.शैलीवैज्ञानिक समीक्षा. |

इ. समिक्षापद्धतीतून साहित्यकृतीचा चिकित्सक अभ्यास करता येतो.

१.**आस्वादक समीक्षा:**

साहित्य समीक्षेची ही एक लोकप्रिय समीक्षा पद्धती आहे. साहित्य समीक्षेत काटेकोर नियमांना धरून साहित्याचे वाभाडे न काढता साहित्याकडे सहानुभूतीने व रसिकतेने पाहावे. अभ्यासकाला आलेल्या वैयक्तिक अनुभवाच्या आधारे समीक्षा केली जाते. आस्वादक समीक्षेच्या आधारे साहित्यकृतीचे विश्लेषण केल्यास साहित्यकृतील योग्य न्याय मिळवून देता येतो. साहित्याचे विश्लेषण करताना काटेकोर नियमांना अनुसरून केले जात नाही. तर विश्लेषण करताना साहित्याकडे सहानुभूतीने पहिले जाते. साहित्यकृतीचे रसिकतेने विश्लेषण केले जात असते.  साहित्यकृतीचा आस्वाद घेणे म्हणजे साहित्याचा आनंद घेणे. या विचाराधारेतून आस्वादक समीक्षेचा उदय झाला आहे. मुळात समीक्षा म्हणजेच साहित्यकृतीचा आस्वाद घेणे होय.

२.**समाजशास्त्रीय समीक्षा:**

साहित्य हा समाजाचा आरसा असतो. साहित्यातून समाजाचे प्रतिबिंब पडत असते. लेखक हा देखील समाजाचा एक भाग असतो. साहित्यकृती ही समाजातच जन्माला येत असते. म्हणजे साहित्यिक हा देखील समाजातच जन्माला आलेला असतो. त्या समाजाचे संस्कार सातत्याने होत असतो. त्यामुळे साहित्य आणि समाज ह्यांच्यातील संबंध हे महत्त्वपूर्ण स्वरूपाचे असतात. समीक्षक हा सुध्दा समाजाच एक भाग असतो. याचाच अर्थ समाजाशिवाय लेखक आणि साहित्यकृती होऊ शकत नाही या विचारधारेतून समाजशास्त्रीय समीक्षा उदयास आली आहे. समाजशास्त्रीय समीक्षेची व्याख्या करताना डॉ.अशोक जोशी म्हणतात की, "समाजशास्त्र या ज्ञानशाखेचे मुलभूत ज्ञान मिळवून साहित्यसमीक्षेत समाजशास्त्रातील नेमक्या कोणत्या संकल्पना वापरता येतील याची जाणीवपूर्वक निवड करून प्रत्यक्ष वाङमयाच्या संदर्भात त्यांचा वापर करणे म्हणजे समाजशास्त्रीय समीक्षा करणे." समाजशास्त्रीय समीक्षेची अत्यंत साधी आणि सोपी व्याख्या डॉ.अशोक जोशी यांनी केलेली आहे. साहित्यकृतीला योग्य न्याय मिळवून देण्यासाठी समाजशास्त्रीय समीक्षा नेहमी उपयुक्त ठरते.

**३.मार्क्सवादी समीक्षा:**

साहित्य सामिक्षेबाबत मार्क्सवादी समीक्षेचा उदात्त दृष्टीकोन असलेला दिसून येतो. साहित्य ही एक स्वतंत्र निर्मिती नसून ती समाजाची निर्मिती असते. साहित्य हे समाजसापेक्ष असते. साहित्य निर्मिती करणे ही सामजिक गोष्टच आहे. त्यामुळे साहित्यातून येणारी मूल्ये ही स्वतंत्र मूल्ये नसतात तर ती समाजाची मूल्ये असतात. याचा विचार करून मार्क्सवादी समीक्षेत सामाजिक मूल्ये समोर ठेऊन साहित्यकृतीवर निष्कर्ष जातात. साहित्य आणि समाज यांचा परस्पर अनुबंध असतो. हे मान्य करून मार्क्सवादी समीक्षा केली जाते. साहित्याचे प्रयोजन साम्यवादी समाजरचना अस्तित्त्वात आणण्यास पोषक असले पाहिजे, श्रमजीवी बहुजन वर्गासाठीते असल्यामुळे ते सुबोध असले पाहिजे असा विचार मार्क्सवादी समीक्षेतून उदयाला आला.

**४.मनोवैज्ञानिक समीक्षा:**

यालाच मानसशास्त्रीय समीक्षा पद्धती असे म्हंटले जाते. सिग्मंड फ्रॉईड यांच्या मानसशास्त्रीय तत्त्वज्ञानातून ही समीक्षा पद्धतीत उदयास आली आहे. मानसशास्त्रात मानवी मनाचा अभ्यास केला जातो. मानवाच्या मनावर बऱ्याच गोष्टी अवलंबून असतात. त्यामुळे साहित्यकृतीचे परीक्षण, विश्लेषण करताना लेखकाचे मन आणि त्याचे व्यक्तिमत्त्व या दोन घटकांचा साहित्यातून शोध घेणे हे समीक्षेचे महत्त्वाचे कार्य आहे. लेखक लिहितो त्याच्या पाठीमागे त्याचा मानसिक संघर्ष असतो. याचा शोध साहित्यकृतीच्या माध्यमातून समीक्षक घेत असतो.

**५.आदिबंधात्मक समीक्षा:**

मानसशास्त्रावर आधारितच ही समीक्षा पद्धती आहे. कार्ल युंग या मानसशास्त्रज्ञाने आदिबंधाची व मुलबंधाची संकल्पना मांडली. माणसांच्या मनातील अबोध शक्ती म्हणजे आदिबंध होय. मनुष्य हा समुहाने राहणारा प्राणी आहे. व्यक्तीची नाळ समाजाशी जोडलेली असते. त्यामुळे व्यक्ती आणि समाज वेगळे करता येत नाहीत. साहित्य हे समाजाच्या सामुहिक जाणीव आकाराला येत असते. म्हणून आदिबंधात्मक

समीक्षेत या सर्व बाबींचा विचार करून साहित्याचा अभ्यास केला जातो. मॉड बॉडकिन ह्या मानसशास्त्राच्याप्राध्यापिकेने युंगप्रणीत आदिबंधाच्यासिद्धांताचा आधार घेऊन *आर्किटायपल पॅटर्न्स इन पोएट्री* (१९३४)हा ग्रंथ लिहिला.या ग्रंथाने मानसशास्त्रीय साहित्यसमीक्षेचा एक महत्त्वाचा भाग असलेल्या आदिबंधात्मक समीक्षेचा पाया घातला.

**६.स्त्रीवादी समीक्षा:**

फिमेल म्हणजे स्त्री तर फिमिनेझम म्हणजे स्त्रीवाद होय. १९६० नंतर स्त्रीवादी साहित्याचा प्रवाह मराठी साहित्यात निर्माण झाला. स्त्रीवादी साहित्याच्या अभ्यासातून स्त्रीवादी  समीक्षा ही संकल्पना पुढे आली. स्त्रीवादी समीक्षेतून स्त्रीवादी प्रश्नांना वाचा  फोडण्याचे काम केले जाते तसेच स्त्रियांचे भावविश्व या समीक्षेतून समजावून घेता येते. स्त्रीवादी साहित्याच्या विश्लेषणासाठी ही एक महत्त्वाची समीक्षा पद्धती आहे.

**७.चरित्रात्मक समीक्षा:**

एखाद्या व्यक्तीच्या संपूर्ण आयुष्यावर दुसऱ्या व्यक्तीने लिहिलेले लेखन म्हणजे त्या व्यक्तीचे चरित्र होय. ज्या व्यक्तीचे चरित्र लिहिले जाते त्या व्यक्तीच्या जगण्याला काही मागचे-पुढचे संदर्भ असतात. तसेच साहित्यकृतीलाही मागचे-पुढचे संदर्भ असतात. असा विचार चरित्रात्मक समीक्षेतून पुढे आला आहे. साहित्यकृतीला असणारे संदर्भ हे त्या लेखकाचे असतात असे ही समीक्षा मानते.  प्रस्तुत समीक्षेच्या आधारे साहित्यकृतीचे विश्लेषण करताना आकलन, अर्थनिर्णयन आणि मूल्यमापन हे त्या व्यक्तीच्या संदर्भाने होत असते. म्हणून चरित्रात्मक समीक्षा पद्धती ही विश्वासार्ह समीक्षा पद्धती मानली जाते.

**८.ऐतिहासिक समीक्षा :**

प्रस्तुत समीक्षेच्या आधारे साहित्याचे मूल्यमापन करताना साहित्यकृतीचे ऐतिहासिक संदर्भ आणि त्यातील गुणदोषांचे परीक्षण केले जाते. सदर समीक्षा पद्धतीतून साहित्यकृतीमध्ये येणारा ऐतिहासिक

आशय अथवा संदर्भ पाहावे लागतात. कारण यातूनच साहित्यिकांना इतिहास आणि समकाल यामधील अंतर सहज लक्षात येते. म्हणजे ऐतिहासिक समीक्षा पद्धतीतून साहित्यकृतीचे आकलन करत असताना साहित्यकृतीत आलेले पारंपारिक संदर्भ त्यालाच आपण ऐतिहासिक संदर्भ असे म्हणतो त्याच्या आधारे कलाकृतीचे गुणदोष तपासून लेखकाला व वाचकाला मार्गदर्शन केले जाते. त्याला ऐतिहासिक समीक्षा पद्धती असे म्हणतात.

**९. भाषाशास्त्रीय समीक्षा :**

भाषा आणि साहित्य यांचा जवळचा संबंध आहे. भाषेशिवाय साहित्यनिर्मिती अशक्य आहे. म्हणून साहित्यकृतीचा अभ्यास करीत असताना भाषेचा अभ्यास करणे क्रमप्राप्त आहे. म्हणून भाषाशास्त्रीय समीक्षा पद्धतीत साहित्यकृतीच्या भाषेच्या गुणदोषांचे परीक्षण व मूल्यमापन केले जाते. कलाकृतीच्या भाषेवर या समीक्षा पद्धतीतून प्रकाश टाकला जातो. एखादी साहित्यकृती निर्माण होत असताना ती साहित्यकृती ज्या भाषेतून निर्माण होत असते त्या भाषेचा अभ्यास करून त्यातील गुणदोष दाखविले जातात. भाषेच्या अंगाने साहित्यकृतीचे वस्तुनिष्ठपणे मूल्यमापन केले जाते. यावरून अलीकडील काळातील एक महत्त्वाची समीक्षा पद्धती म्हणून भाषाशास्त्रीय समीक्षेला ओळखले जाते.

**१०. शैलीवैज्ञानिक समीक्षा :**

साहित्यकृतीचा वस्तूनिष्ठ अभ्यास व्हावा यासाठी अलीकडे जी महत्त्वपूर्ण संकल्पना विकसित झाली ती म्हणजे शैली होय. Style या शब्दाला पर्याय म्हणून मराठीमध्ये शैली ही संकल्पना अस्तित्वात आली. तसे पाहिले तर प्राचीन काळापासून शैली ही संज्ञा वामनाच्या 'रीती' या संकल्पनेला समानार्थी वापरली जात होती. परंतु अलीकडे भाषा विज्ञानाच्या अनुषंगाने तीला व्यापक स्वरूप प्राप्त झाले आहे. सर्वसाधारणपणे आपण शैली हा शब्द भाषाशैली या अर्थाने वापरतो. परंतु हा अर्थ परिपूर्ण स्वरूपाचा वाटत नाही. कारण शैली हा शब्द आपण दैनंदिन जीवनात अनेक अर्थांनी वापरत असतो. उदा. भाषाशैली, साहित्यशैली, बोलण्याची शैली, गाण्याची शैली, इ. शैली ही संज्ञा रीती, पध्दत, ढब, लकब, धाटणी, कौशल्य,

वैशिष्ट्ये, तंत्र, अशा अनेक अर्थांनी वापरली जाते. शैली या घटकाचा विचार 'साहित्यविचार' आणि 'भाषाविज्ञान' या दोन संकल्पनांच्या आधारे करता येतो. प्राचीन काळातील 'रीती' विचारातील 'बंधगुण' आणि 'अर्थगुण' यांच्याशी शैलीचा संबंध जोडला आहे. तर अलीकडे भाषाविज्ञानाच्या आधारे शैलीचा शास्त्रशुद्ध पद्धतीने अभ्यास केला जातो त्यास 'शैलीविज्ञान' असे म्हणतात.

## ➢ साहित्यसामिक्षेची कार्ये :-

साहित्यसमीक्षा ही साहित्यकृतीवर केलेली असते. म्हणजेच अगोदर साहित्यकृती निर्माण होते व त्यांतर त्या साहित्यकृतीवर समीक्षा केली जाते. म्हणून समीक्षा ही साहित्यकृतीवर अवलंबून असते. त्यामुळे साहित्यकृतीला अधिक महत्त्व प्राप्त होते. परंतू वाचकाला साहित्यकृतीचा नेमका अर्थ समजेलच असे नाही. तो नेमका अर्थ वाचकापर्यंत पोहोचवण्याचे कार्य समीक्षा करते. म्हणून समीक्षा ही महत्त्वाची ठरते. ती वाचक आणि लेखक यांच्यातील महत्त्वचा दुवा आहे. तिची अनेक कार्ये आहेत ती पुढीलप्रमाणे प्रमाणे सांगता येतील.

### १.साहित्यकृतीचे रसग्रहण :-

साहित्यसमीक्षेत साहित्य हे केंद्रस्थानी असते. त्या साहित्यकृतीचे रसग्रहण करून त्या साहित्यकृतीतील नेमका अर्थ वाचकापर्यंत पोहोचवणे हे महत्त्वाचे कार्य समीक्षेचे असते. त्यामुळे वाचकांना त्या विशिष्ट साहित्यकृतीतील अनुभवाचा आस्वाद घेता येतो. म्हणून रसग्रहण समीक्षेचे महत्त्वाचे कार्ये आहे.

### २.साहित्यकृतीचे मूल्यमापन :-

साहित्यकृतीचा चिकित्सक  अभ्यास करून तीचे  वस्तुनिष्ठपणे मूल्यमापन करण्याचे कार्य समीक्षा करते. त्यातून साहित्यकृतीतील गुण-दोषाचा शोध घेता येतो.

**३.मार्गदर्शन करणे :-**

समीक्षेच्या माध्यमातून लेखक व वाचकांना मार्गदर्शन करण्याचे काम समीक्षक करीत असतो. लेखकाला साहित्यकृतीविषयी असलेल्या उणीवा दाखवणे व मार्गदर्शन करणे. त्यातून साहित्यनिर्मितीला योग्य वळण लागते. वाचकाच्या दृष्टीने वाचकांना चांगले साहित्य वाचण्याची अभिरुची निर्माण करणे, त्याचबरोबर उच्च वाङमयीन अभिरुचीचे निकष वाचकापर्यंत पोहोचविण्याचे कार्य समीक्षा करते.

**४.साहित्यकृतीचे स्थान निश्चित करणे :-**

साहित्यनिर्मितीचा कालखंड, वाङमयीन प्रकार, साहित्यातील संप्रदाय यामधील त्या साहित्यकृतीचे स्थान निश्चित करण्याचे कार्य समीक्षा करत असते. म्हणजे वाचकांना त्याची जाणीव करून देणे. त्यातून साहित्यकृतीचे साहित्यव्यवस्थेतील स्थान नेमकेपणाने स्पष्ट होते. साहित्यकृतीचे साहित्यव्यवस्थेतील स्थान निश्चित करणे हे समीक्षेचे महत्त्वाचे कार्य आहे.

**५. वाङमयीन आणि जीवनमूल्यांचा शोध घेणे :-**

साहित्यकृतीचे श्रेष्टत्व तीच्या वाङमयीन मुल्यांवर अवलंबून असते. अशा वाङमयीन मुल्यांचा शोध समीक्षा घेत असते. तसेच वाङमयीन मुल्यान बरोबरच जीवनमूल्यांचाही शोध समीक्षा घेत असते. साहित्यिक साहित्याच्या माध्यमातून जीवनमूल्ये समाजामध्ये रुजवत असतो. तर काळाच्या कसोटीवर ही जीवनमूल्ये तपासण्याचे कार्य समीक्षा करते.

या बरोबरच इतरही अनेक कार्ये समीक्षा करत असते. समीक्षेच्या माध्यमातून साहित्यकृतीचा विषय, आशय, अर्थ, संरचना, रूपबंध, भाषा, विचारप्रणाली, तत्त्वज्ञान, जीवनदृष्टी आदि घटकांशी संबंध तपासला जातो.

- **निष्कर्ष :-**

१. साहित्यकृतीचा नेमका अर्थ वाचकापर्यंत पोहचविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य साहित्य समीक्षेच्या माध्यामतून केले जाते.

२. साहित्य समीक्षा ही लेखकाबरोबरच वाचकालाही मार्गदर्शन करते. यातून साहित्यकृतीतील गुण-दोष दाखविले जातात.

३. साहित्य समीक्षेतून साहित्यकृतीचा वस्तुनिष्ठ अभ्यास करून तिची योग्यता स्पष्ट केली जाते.

४. साहित्य समीक्षेच्या माध्यामतून वाचकांची वाङमयीन अभिरुची विकसित केली जाते.

५. साहित्यकृतीच्या चिकित्सक अभ्यासातून कलाकृतीविषयी योग्य निर्णय देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य साहित्य समीक्षेच्या माध्यामतून केले जाते.

- **समारोप :-**

अशा प्रकारे समीक्षा ही लेखकांनी निर्माण साहित्यकृतीबद्दल यथार्थ निर्णय देणे, कलाकृतीचा जाणकारपणे आस्वाद घेणे, त्याचबरोबर रसग्रहण, परीक्षण, मूल्यमापन करण्याचे कार्य करते. ती काही निश्चित तत्त्वांच्या आधारे, पूर्वग्रहदूषित मनाने कलाकृतीतील सौंदर्याचाशोध घेऊन न्याय देण्याचे महान कार्य करीत असते. लेखकांना मार्गदर्शन करणे हे समीक्षेचे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. तर समीक्षक हा लेखक आणि वाचक यांच्यातील महत्त्वाचा दुवा आहे. समीक्षा ही साहित्यकृतीच्या मुळाशी जाण्याचा नेहमी प्रयत्न करत असते.

त्यातून त्या साहित्यकृतीतील नेमके मर्म उलघडत असते. साहित्यकृतीवर साहित्यसमीक्षा अवलंबून असते तर आपल्या साहित्यकृतीला योग्य न्याय मिळावा व तीचे साहित्यविश्वातील स्थान स्पष्ट व्हावे असे लेखकाला वाटत असते. म्हणून साहित्यकृती व समीक्षा यादोन्ही परस्परावलंबी संकल्पना आहेत.

- **संदर्भ ग्रंथ :-**

१. नेमाडे, भालचंद्र. टीकास्वयंवर, साकेत प्रकाशन,औरंगाबाद.

२. डॉ.मनोहर जाधव,संपा.'समीक्षेतील नव्या संकल्पना'

३. पाटील गंगाधर : 'साहित्य समीक्षेचे स्वरूप' 'अनुष्टुभ' सप्टेंबर-ऑक्टोबर-१९८७.

४. पाटील गंगाधर :सामिक्षामीमांसा,मौज प्रकाशन मुंबई.

५. गो.म.कुलकर्णी,(संपा) 'नवसमीक्षा' मेहता पब्लिसिंग हाऊस,पुणे.

६. वसंत आबाजी डहाके :मराठी समीक्षेची सद्यस्थिती',पॉप्युलर प्रकाशन मुंबई.

-----------------------------------------

# ना.धों.महानोर यांचे मराठी ग्रामीण कवितेतील योगदान

**डॉ.महेश रणदिवे**
**मराठी विभाग,**
**राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज कोल्हापूर.**
**भ्रमणभाष:९५०३६०७६७५.**
**maheshrandive937@gmail.com**

**प्रास्ताविक:**

१९६० नंतरच्या मराठी ग्रामीण कवितेतील दर्जेदार ग्रामीण कवितालेखन करणारे एक महत्वाचे कवी म्हणून कवी ना.धों.महानोर यांना ओळखले जाते.कवी महानोरांचा जन्म ग्रामीण भागात विशेषतः शेतकरी कुटुंबात झाला.त्यांचे बालपण आणि नंतरचे जीवनही त्यांनी ग्रामीण भागातच व्यतीत केल्यामुळे ग्रामजीवनाचा,शेतीवाडीचा त्यांना स्वानुभव होता.शेती करताना काय वेदना होतात हे त्यांनी स्वत: अनुभवलेले होते.त्यामुळेच वास्तव जीवनचित्रण त्यांच्या कवितेतून अभिव्यक्त झालेले आहे.अस्सल कसदार ग्रामीण कविता लेखन त्यांनी केलेले असल्यामुळेच त्यांची कविता जनमानसात आपले वेगळेपण निर्माण करू शकली. 'रानातल्या कविता' या त्यांच्या पहिल्याच कवितासंग्रहामुळे ना.धों.महानोर प्रसिद्धीस आले.सुरवातीच्या काळात कवी महानोर ऐन तारुण्यात असल्यामुळे त्यांनी निसर्गविषयक,प्रेमविषयक कविता मोठ्या प्रमाणात लिहल्या.स्त्री-पुरुषांना एकमेकांची असलेली ओढ,शारीरिक आकर्षण,प्रियकर-प्रियसी यांच्यातील मनोमिलनाची ओढ हे सर्व काही खुलेपणाने कुठलाही आडपडदा न ठेवता निसंकोचपणे त्यांनी मांडले.त्यामुळेच त्यांची प्रेमविषयक,निसर्गविषयक कविता वाचकाच्या पसंतीस उतरली आणि आपले मराठी ग्रामीण कवितेत वेगळे स्थान निर्माण करू शकली.कवी ना.धों.महानोर यांनी 'रानातल्या कविता'(१९६७),'वही'(१९७१),'पानझड'१९९७, 'पावसाळी कविता'(१९८२),'अजिंठा(१९८४),'गाथा शिवरायाची'(१९९१),'जगाला प्रेम अर्पावे'(२००५),'प्रार्थना दयाघना' (१९९०),'गंगा वाहू दे निर्मळ(२००७)'दिवे लागणीची वेळ'या सारखे एकावर एक असे सरस दर्जेदार कवितासंग्रह लिहले आणि मराठी ग्रामीण कवितेत मोलाची भर घातली.

'रानातल्या कविता'हा कवितासंग्रह लिहित असताना कवी महानोर ऐन तारुण्यात होते.त्यामुळे या कवितासंग्रहात प्रेमविषयक कविता अधिक आहेत.त्यांच्या कवितेतील निसर्ग मानवी देह धारण करतो.

कवीचा निसर्गाचा खूप बारकाईने अभ्यास होता.त्यामुळेच निसर्गाचे अतिशय सूक्ष्म बारकावे त्यांच्या या कवितासंग्रहातून तपशिलासह आलेले आहेत.खळखळनारे पाणी,बहरलेली राने,पक्ष्यांचा किलबिलाट, भरलेली कणसे,निसर्गाच्या संगतीने मानवाच्या खुलणाऱ्या प्रेमवृत्ती हे सर्व काही मुक्तपणे आलेले आहे.रान हेच कवीचा प्राण आहे हे सांगताना कवी 'रानातल्या कविता' या कवितासंग्रहाच्या पहिल्याच कवितेत लिहतात,

"ह्या शेताने लळा लाविला असा असा की,
सुख -दु:खाला परस्परांशी हसलो रडलो
आता तर हा जीवच अवघा असा जखडला
मी त्याच्या हिरव्या बोलीचा शब्द झालो"

रानाचे आणि कवीचे घनिष्ट नाते आहे. हे महानोरांच्या या कवितेतून लक्षात येते.शेतातील कामे करता करता रान हेच कवीचे सर्वस्व बनते.रानातील पिकांची आणि त्यांची मैत्री होते.रान सोडून त्यांना कुठे जाऊ वाटत नाही.गेले तर त्यांचे सारे लक्ष रानात गुंतून राहते.त्यांचा जीव हिरव्या बोलीत एकनिष्ठ होतो.हिरवा साक्षात्कार झालेल्या कवी मनाला गव्हाची पिवळी सळसळती शेते, पावसाचे खेळ,नदी काठावरील केळीचे बन,गाभळलेल्या चिंचेला नवतीच्या पोटी न धरवणारा भार, जांभळे मेघ नदीच्या पाण्यात वाहू लागतात,राजबन्सी पाखरु हे सृष्टीतील बदल महानोर मानवी रूपातून साकार करतात.कधी कधी कवीला पूर्व आयुष्याच्या आठवणी बोचऱ्या होतात.तरी देखील मनाला समजावून निराश न होता 'माझे रान,रानातील झाडे माझ्यासाठी फुलांच्या पायघड्या अंतरातील'असे महानोर आपल्या ६३ व्या कवितेत म्हणतात.

"दिवसभर हिरव्या पिवळ्या पिकातून पायवाटातून लांबच्या शेतातून हिंडताना साऱ्या वृत्ती फुलून येतात. 'रान हेच माझे घर होऊन बसले आहे.अनंत भानगडींच्या कोलाहलातून धडपडताना विषण्ण असा मी जेव्हा शेतावर पडून असतो,तेव्हा झाडाचे हिरवेपण, किलकिलणारी पाखरे, दंडाच्या पाण्यातून सरकत जाणारे आभाळ,बायकांची गाणी मला केव्हा सोडून नेतात कळत नाही. हा सारा आनंद मी जेव्हा कवितेत मांडू पाहतो तेव्हा पन्नास,साठ,सत्तर कितीही ओळी लिहिल्या तरी अपूर्ण वाटतात." स्वतः ना.धों. महानोरांनी एका ठिकाणी आत्मनिवेदनात लिहिलेल्या या मजकुरातून कवी महानोर व रान यांच्यामधील अतूट नाते स्पष्ट होते. निसर्ग संवेदन हा महानोरांच्या कवितेचा प्रमुख विशेष आहे

रानातल्या कविता या कवितासंग्रहातील एकूणच कवितांचे स्वरूप पाहिल्यावर लक्षात येते की, काही निवडक कवितांचा अपवाद वगळता महानोरांच्या व्यक्तिमत्वाला स्त्रीच्या शरीर सौंदर्याचे व या संदर्भातील शृंगार भावनेचे विशेष आकर्षण आहे.म्हणून बऱ्याचदा त्यांच्या निसर्गप्रतिमेतून येणारी स्त्री किंवा वर्णनातून येणारी स्त्री सौंदर्याविना,शृंगार भावने शिवाय आलेली दिसत नाही. तिच्या काचोळीला चांदण्याचा जर असतो.मिठीत आल्यावर ती भरातली ज्वार होते.कित्येक दिवसांनी तिच्या पोटी राव्याची सावली देते.शहरातील बंदिस्त प्रेमापेक्षा रानातील रांगडा शृंगार अधिक पटीने खुलतो.हे महानोरांच्या अनेक कवितेतून निदर्शनास येते.वयात आलेल्या प्रेअसीला प्रियकराविषयी असणारी ओढ कोठीही आडपडदा ना ठेवता महानोर स्पष्ट करतात.प्रणयासाठी आतुर झालेल्या प्रियसीचे चित्रण करताना महानोर लिहतात.

"डोळे थकून थकून गेले
पाखरासारखा येऊन जा
रान भलतच भरात जरा
पिकात धुडघोस घालून जा"

प्रियकराला भेटण्यासाठी आतुर झालेली तरुणी या कवितेतून भेटते.ती कोणालाही न लाजता खुलेपणाने प्रियकराला भेटण्यासाठी येण्याची विनंती करते आहे.प्रियकर लवकर येत नाही म्हणून ती कासावीस होते.आणि पाखरासारखा पटकन येऊन जा असे ती म्हणते.या प्रियसीचे चित्र नैसर्गिक रुपात कवीने स्पष्टपणाने मांडलेले आहे.स्त्री-पुरुष यांना एकमेकांविषयी विशेष आकर्षण असणे साहजिकच आहे. 'पाखरू' ही प्रतिमा कवीने प्रियकरासाठी वापरलेली आहे.कवी महानोरांच्या कवितेमधून निसर्गाच्या प्रतिमेतून शृंगारने नटलेली स्त्री आणि स्त्रीच्या सौंदर्यातून नटलेला निसर्ग अशी दुहेरी रचना आहे.

महानोरांच्या शृंगार कवितेविषयी वि.स. जोग लिहितात "महानोर यांची कविता आपणास आकर्षित करते ती बहुतांशी उत्थान शृंगारिक आहे.उत्तर पेशवाईतील लावणीच्या धाटणींना उभी राहणारी त्यांची कविता आहे. सर्व सुखात मैथुलन सुख मोठे मानणाऱ्या राम जोशींच्या धाटणीची आहे.

'वही' हा ना. धों.महानोर यांचा दुसरा कवितासंग्रह आहे.या कवितासंग्रहामध्ये लावणी स्वरूपाच्या कविता आहेत.यामध्ये एकूण नऊ लावण्या आहेत.त्याचबरोबर काही सामाजिक कवितांचा देखील समावेश या संग्रहामध्ये आहे.पेशवाईतून लावणीला मिळालेला राजाश्रय आणि

लाभलेल्या परंपरेतून लावणी अधिक समृद्ध झाली.रानातल्या कविता नंतर 'वही'मधल्या कवितेतून रानाच्या पार्श्वभूमीचा उपयोग करून प्रामुख्याने स्त्रीलाच मध्यवर्ती स्थान दिले आहे.या कविता संग्रहातील बहुतांशी कविता स्त्रीभोवती तिच्या सौंदर्याभोवती रुंजी घालताना दिसतात. 'वही' मधून स्त्री चित्रणाचा झालेला वावर प्रकाशने जाणून येतो

"जसा जवळी जरा बसा
जीव हा पिसा तुम्हावीन बाई
कोणता करू शिणगार सांगा तरी काही"
(कविता क्रमांक ५२)

नवऱ्यासाठी वाटेल तो शृंगार करण्याची तयारी असलेल्या स्त्रीचे शृंगारासक्त मन प्रस्तुत कवितेतून कवीने उभे केले आहे.स्त्रीच्या शृंगार भावनेला कवीने सहजपणे वाट मोकळी करून दिली आहे.महानोरांच्या लावणीचा घाट आणि थाट दोन्ही वैशिष्ट्यपूर्ण आहेत

"झडीचे दिवस जल्दी शेजबाज करू
हावऱ्या जीवाला का
येते रात्रच पांघरू"

यावर ती म्हणते,

"तू ही असा कसा
नको ओटी पोटी  धरू
पाळण्यात डोळे
जरा दिवा तरी सारू"

अशाप्रकारे स्त्री मनाची विविध स्पंदने ना.धों. महानोरांनी टिपलेली आहेत.लावणी सारख्या शृंगाराला जवळ करणाऱ्या रचनेतून येणारी स्त्री ही कवीची प्रेयसी नाही किंवा एखादी विशिष्ट स्त्री नाही तर अखिल विश्वातील स्त्रीच्या मनातील शृंगाराची स्पंदने आहेत.'वही'तील स्त्री चित्रणाच्या कवितेचे स्वरूप इतर कवितांपेक्षा भिन्न असल्याचे जाणवते. या कवितासंग्रहामध्ये कवीने लावणी बरोबरच काही सामाजिक कविताही लिहल्या  आहेत.

"दिवा जळे दिवठणी

रोज काळीज कहाणी

भिंती आड काळोखाच्या

डोळा ओथंबले पाणी"

(वही,कविता क्र.१९)

ग्रामीण जीवनातील स्त्रीच्या कष्टाचे,तिच्या दुःखाचे चित्रण सदर कविता करते.स्त्रीच्या वाट्याला येणारा सासुरवास,कुमारी मातृत्व,विधवा झाल्यावर जगावे लागणारे एकांगी जीवन हे सर्व पाहून कवी अस्वस्थ होतात.आज समाज जीवनात प्रचंड बदल झालेले आहेत.संगणकामुळे तंत्रज्ञानामध्ये प्रचंड बदल झालेला आहेत.हे जरी खरे असले तरी देखील आज समाजामध्ये अनेक रूढी परंपरा पाळल्या जात आहेत.त्यामुळे बऱ्याच घरात अनेक स्त्रियांना प्रचंड दुःख भोगावे लागत आहे.यामुळे कवीचे मन उदास होते आणि समाज जीवनाला भिडते.

पावसाळी कविता हा कवी महानोरांचा तिसरा कवितासंग्रह आहे. या कवितासंग्रहातून निसर्गातील सप्तरंगाची चौफेर उधळण करत पावसाळी कविता कवीने मांडलेल्या आहेत. पावसाळा हा कवीचा आवडता ऋतू.पावसाळयात शेतामध्ये उमलणारी पिके,सर्वत्र आनंदमय वातावरण पाहून कवीचे मन बेहोष होते आणि आनंदाचे गाणे गाऊ लागते.

"हिरव्या पानात पानात काही चावळ चालते

कशी बोलता बोलता अवेळीच सांज होते."

झाडांची वाऱ्याने हलणारी पाने पाहून त्यामध्ये कवीला तरुणीची हालचाल जाणवते.शृंगारासक्त कवीचे मन या ठिकाणी प्रकट झालेले दिसते.निसर्गाशिवाय प्रेम खुलत नाही याची प्रचिती येते.प्रेयसी बरोबर बोलता बोलता कधी रात्र होते.अंधार पडतो हे प्रियकराला कळत नाही.इथं नकली प्रेम नाही तर खरंखुरं प्रेम आहे. प्रेमातील गोडवा आहे. त्यामुळे कधी सांज होते हे दोघांनाही कळत नाही.पावसाळी कविता या कवितासंग्रहापासून कवी अल्प प्रमाणात का होईना वास्तवाकडे वळलेले दिसतात.उदा.

"राखोंडीच्या विस्तवाचा पारा घेऊन

कुठला पक्षी

पुन्हा नवे उभे करील

नवे घर नवे नक्षी''

(पावसाळी कविता,पृ.क्र.५२)

समाजातील विदारक वास्तव पाहून कवी खिन्न होतात.आणि या काव्यओळीतून नवा आशावाद निर्माण करतात.

पळसखेडची गाणी हे कवी महानोरांचे लोकगीतांचे संकलन आहे.कवी महानोर यांचा जन्म पळसखेड या गावात झाल्यामुळे आजूबाजूचे गावातील सर्व गोष्टींचे त्यांचे स्वानुभव त्यांच्या पाठीशी आहेत.त्यामुळे तेथील संस्कृतीचा संस्कार महानोर यांच्या मनावर निश्चितच झालेला दिसून येतो.डॉ. हेमलता गायकवाड यांनी आपल्या 'आधुनिक मराठी ग्रामीण कविता' या पीएच.डी प्रबंधातून 'आधुनिक मराठी ग्रामीण कवितेचा मानदंड'असा कवी महानोरांचा उल्लेख केला आहे.हा उल्लेख कवी महानोरांच्या ग्रामीण जीवनाच्या तळाशी असलेल्या नाळेशी साक्ष ठरणारा आहे.

पळसखेड मध्ये लहानपणापासून महानोरांनी जी गाणी ऐकली ती गाणी आईची असो, गावातील स्त्रियांची असो ती गाणी त्यांच्या मुखोद्गत झाली होती.सण उत्सवाच्या वेळी एकत्र येऊन स्त्रिया गाणी म्हणायच्या ती गाणी कवीने शब्दातून साकार केली आहेत.

''देवा सूर्यनारायणा नीत नेमानं उगवा

मह्या कपाळीचं कुंकू साता जन्मात टिकवा''

जीवन जगत असतान नवरा आणि बायको यांचे संबंध अतिशय महत्त्वाचे असतात.बायकोला संकट काळात व नवऱ्याला संकट काळात एकमेकाला साथ देणारे दोघेच असतात.त्यामुळे कुंकू गेल्यावर स्त्रीला पाठीमागे खूप वेदना भोगाव्या लागतात.त्यामुळे कवी महानोर जन्माचे कुंकू वाचवा अशी विनवणी करणाऱ्या स्त्रीचे चित्रण वरील कवितेतून करतात.

पळसखेडची गाणी याचे संकलन करताना कवी महानोरांनी गावभर फिरून गाण्यांच्या रचनेतील विस्कळीत पणाबद्दल शंका विचारून काही शृंगारिक ओव्या संदर्भात गावातील बायका बोलत नसल्याने त्यांच्या सासूकडून किंवा अन्य जेष्ठाकडून त्या ओव्या त्यांनी संकलित केल्या आहेत.त्यातील ओवीची रचना साधी लवचिक आणि मुक्त बांधणीची असून चार चार ओळींच्या कडव्याची एक एक गाणी आहेत.लोकगीतांचे

संकलन करून आपल्या गावाचे वैभव जपण्याबरोबरच लोकसाहित्याच्या अभ्यासाच्या दृष्टीने कवी महानोर यांनी एक संकलक म्हणून पळसखेडची गाणी संकलित करून अतिशय महत्वपूर्ण काम केले आहे.

'अजिंठा' या खंड काव्याच्या निमित्ताने कवी महानोरांनी त्यांच्या काव्य प्रवासात एक नवा टप्पा मांडला आहे.मेजर गिल आणि बंजारा जातीची आदिवासी समाजातील पारू यांचे जंजिऱ्याच्या साक्षीने घडलेले प्रेमशिल्प प्रस्तुत खंडकाव्यातून भाव सत्याद्वारे कवीने प्रकट केलेले आहे.खंडकाव्य हा एक ललित वाङ्मयाचा प्रकार असल्याने इतर साहित्याप्रमाणेच रसात्मक जीवनदर्शन हा खंडकाव्याचा प्राण असून तो एक स्वतंत्र स्वयंपूर्ण अविष्कार आहे.

पारू आणि गिल यांच्यामधील ताटातूट वाचकांना खिन्न करून टाकते. लेण्याच्या साक्षीने घडलेल्या रॉबर्ट गिल आणि पारूच्या प्रेमकथेद्वारे महानोर वाचकांना विचारप्रवण बनवतात.अजिंठ्याचे शिल्प सौंदर्य पाहिल्यावर मेजर गीलला शिल्प सौंदर्याची भुरळ पडते याचे चित्रण करताना कवी महानोर लिहतात.

"तो पारूच्या डोळयात पाहतो डोळे टाकून
लेण्यांच्या समोरच्या टेकडीवर बांधल्या
त्याच्या झोपडीत राहिलेले रंग गिरवतो
कधीतरी अजंटा गावाला जाणं येणं निमित्त मात्र
इथल्याच झाडातून जंगलातून भटकणं दूरवर
पारूच्या सहवासात
त्याच्या आयुष्यात एक अनोखी दरवळ"

अजिंठा लेण्यामध्ये असलेल्या महाकाल बुद्धाच्या विशाल मूर्तीसमोर बुद्धाच्या साक्षीने पारूबरोबर तो विवाहबद्ध होतो.निळया डोळयांचा गोरा गील आणि पारू यांचे प्रेम तिचा भाऊ तिचा समाज नाकारतो. पण गिल मधील माणुसकीने गिलच्या प्रेमाने पारुचेही आयुष्य आनंदी होते. एक आदर्श प्रेम कहानी कशी असावी याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे हे खंडकाव्य आहे.

'प्रार्थना दयाघना' हा कवी महानोर यांचा सहा दीर्घ कवितांचा संग्रह १९९० मध्ये प्रकाशित झाला. कवी महानोरांच्या सौंदर्यवादी कवितेची अस्सल ओळख मोडून काढणारी कविता या संग्रहामध्ये आढळते.सामाजिक संवेदनशीलता आणि मानवतेचा पुरस्कार या कवितासंग्रहातून प्रकट

झालेला आहे.१९८० नंतर बदललेल्या ग्रामीण जीवन व्यवस्थेला डोळयासमोर ठेवून कवीने ग्रामजीवन,ग्रामजीवनातील शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर लक्ष केंद्रित केलेले आहे.

हा कवितासंग्रह म्हणजे त्यांच्या कवितेचा एक महत्वाचा  टप्पा मानला जातो.उध्वस्त आणि देशोधडीला लागलेल्या शेतकरी आणि खेडे हा या कवितेचा केंद्रबिंदू आहे.या संग्रहातील पहिल्याच कवितेतून कवी आपल्या मनातील करुणा बदलत्या ऋतुमानाप्रमाणे बकाल झालेले खेडे आणि मानवी जीवनामध्ये राजकारणामुळे निर्माण झालेली वाताहात अत्यंत समर्पक शब्दांमध्ये चित्रित करतात. दयाघन आभाळाला बरसण्याची विनंती करण्यासोबतच कवी राजकीय दिरंगाई सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या नरड्याला यातना कशी लावतात याचे चित्रण करतात. महानोर लिहितात

“आणि ती पुन्हा दुःखाच्या ओझानं
गर्भाच्या ओझ्यांनी कोसळून पडली
शंभर दोनशे रांडव  बहिणींच्या वतीने
तिने हंबर्डा फोडला साहेबांच्या दिशेनं”

एकूणच ग्रामीण जीवनाला उघडे करणारे राजकारण,प्रशासन आणि निसर्ग यांच्या कचाट्यातला शेतकरी आणि गाव उभा करताना कवीची भाषा तीव्र आणि आक्रमक होते. समाजव्यवस्थेला विचार करायला भाग पाडते.

‘पानझड’हा कवी महानोर यांचा साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त कवितासंग्रह आहे. १९९७ मध्ये तो प्रकाशित झाला. या कवितासंग्रहात एकूण ८१ कविता असून महानोर यांचे वेगळ्या कवितेचे रूप त्यात आपल्याला पाहायला मिळते.ग्रामजीवनातील कवीला आलेले उदासवाने अनुभव कवीने या कवितासंग्रहातून चित्रीत करत असताना,उध्वस्त गाव उभे करत असताना गावच्या समृद्धीसाठी,गावातील लोकांच्या भल्यासाठी काही पालखीचे अभंग लिहिलेले आहेत.आणि विठुरायाला शेतकरी राजा सुखी होऊ दे,पावसाची बरसात होऊ दे अशी साद घातलेली आहे.

या संग्रहातील कवितेचे आशयाच्या दृष्टीने आपल्याला चार विभाग करता येतात.पहिला भाग हा स्त्री विषयक जाणीवांचा आहे.दुसरा विभाग निसर्गाचे वस्तुनिष्ठ स्वरूपात चित्रण करण्याचा प्रयत्न कवीने केलेला आहे.या विभागातील सात कविता मधून कवीने सामाजिक जाणीवांच्या सोबतीने निसर्ग चित्रण

केले आहे.चौथ्या आणि शेवटच्या भागात शेती,निसर्ग आणि मानवी जीवन विषयक चिंतन कवीने व्यक्त केले आहे.

“पिट गळे जात्यातून

तसे पाणी डोळ्यातून

आई करपले हात

तुझे भाकरी भाजून”

कवी महानोरांच्या कवितेतील स्त्रीविषयक सौंदर्यवादी जाणिवा या कवितासंग्रहात स्त्रियांचा वस्तुनिष्ठ विचार करताना दिसतात.स्त्रीच्या आदिम दुख:ला आणि शोषणाला कवी शब्दांच्या माध्यमातून व्यक्त करतो.आईचे दुःख कवीला बघवत नाही.त्यामुळे आईचे दुःख कवी आपल्या शब्दातून व्यक्त करतात. आणि आईच्या दुःखाला मोकळी वाट करून देतात. पालखीचे अभंग या भागातून कवी पंढरपूरच्या विठ्ठलाशी संवाद साधत स्वतःच्या आणि शेतकऱ्यांच्या सुखदुःखाच्या व्यथा व्यक्त करतात.ग्रामीण जीवनातील दुष्काळ जावा यासाठी विठ्ठलाला ते साकडे घालतात.

“तुझी चंद्रभागा घालूनही वळसा

अजिंठ्याच्या देशा वळवावी”

अशी ही भावनिक साद ग्रामीण जीवनातील दुष्काळ दूर होण्यासाठी कवी विठ्ठलाला घालतात.पानझड मधील एकूण कवितांचा विचार करता पानझड हा कवितासंग्रह ग्रामजीवनाचे वास्तव रूप मांडताना दिसतो.

‘गाथा शिवरायांची’ छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवन आणि कार्यावर प्रकाश टाकणारा हा खंड काव्यात्मक प्रयोग कवी महानोर यांनी १९९८ साली केला. यातून शिवरायांचे चरित्र उभे करत असताना रयतेच्या संदर्भातला आणि कामकाजाचा दृष्टिकोन महाराजांचा कसा होता.याचे मध्ययुगीन कालखंडाच्या वातावरणाशी एकरूप होऊन कवीने वर्णन केलेले आहे. शिवरायांच्या संदर्भातील आपल्या मनातील भावनात्मक संवेदनशीलताही कवीने व्यक्त केलेली आहे.दुष्काळ संदर्भात,शेती संदर्भात आणि समाजव्यवस्थे संदर्भात शिवरायांची असणारी धोरणे कवीने सजीवपणे उभी केलेली आहेत.

“आदिलशाही कुतुबशाही कुठली कुठली शाही

तंजावरचे राजे झाले त्यांचे भाई भाई

मिर्झाराजे जयसिंहांशी भेटून लवलाही

निघाले आपलेच गणगोत

यांना सगळ्यांचा घात होईल

बुरगुंडा होईल बया गं आता बुरगुंडा व्हईल''

तत्कालीन समाज जीवन उभे करण्यासाठी कवी महानोर यांनी पारंपारिक लोकगीत प्रकारांचा उपयोग केला आहे.त्यांच्या या कवितासंग्रहामुळे तत्कालीन समाज जीवनाची प्रचिती येण्यास मदत होते.

'तिची कहाणी' या कवितासंग्रहातून स्त्री जीवनाचे वास्तव दर्शन घडवताना कवीने निर्भीडपणाने स्त्रीचे जीवन चित्रण केलेले आहे.स्त्री खेड्यातील असो वा शहरातील तिच्या समस्या कमी अधिक प्रमाणात सारख्याच असतात.सासरच्या लोकांकडून होणारा छळ,मुलगा होत नाही म्हणून व काहींना मुलेच होत नाहीत.म्हणून मिळणारी वागणूक, बाळंतपणे,अघोरी गर्भपात,उपासमार,नवऱ्याकडून होणारी मारहाण,व्यसनाने उद्ध्वस्त होणारा संसार,घराच्या व बाहेरच्या कामाचे प्रचंड ओझे,शारीरिक श्रमाचे प्रमाण जास्त आणि योग्य आहार व औषधोपचार यांचा अभाव अशा अनेक प्रश्नांमुळे स्त्रीच्या पुढे अनेक समस्या उद्भवतात.व ती वेगळ्या गर्तीत सापडते.त्यामुळे तिला दुख:ला सामोरे जावे लागते.यातून संघर्ष करीत अनेक स्त्रिया पुढे येतात.आज शहरातील संस्कृती हळूहळू खेड्यापर्यंत पोहोचत आहे.या ना त्या कारणांमुळे स्त्रियांचा सहभाग हा विविध क्षेत्रामध्ये वाढतो आहे.स्त्री पुढे येताना दिसते आहे असे सकारात्मक चित्रण देखील 'तिची कहाणी' मधून कवी महानोर यांनी केलेले आहे.महानोरांच्या कवितेतील स्त्रीची कहाणी दुःखाची आहे.तसेच ती सुखाची देखील आहे.

निर्भयपणे अन्यायाच्या विरोधात उभे राहणारी स्त्री अभिव्यक्त करताना महानोर लिहतात.

''बेहद बेगुमान आयुष्य उधळून

बेघर लोकांना कवेत कवठाळून

सोसून सगळे घाव लाट्यांचे काट्यांचे

प्राण पणाला लावून''

काही स्त्रिया अन्यायाविरुद्ध लढा उभा करतात.आणि स्वतःबरोबर अनेकांना न्याय मिळवून देतात.अशा धाडसी स्त्रीची कहाणी देखील ना.धों.महानोर तिची कहाणीतून उभी करतात

“कोण्या ज्ञानोबाची गंगा वाहते ग तुझ्या दारी

कुठे शिकले ग माय दुःख सोसण्याच्या वेणा

साऱ्यांसाठी हसण्याचा पुन्हा खोटाच बहाणा”

संसार करताना सर्वांचे काळजी वाहताना कितीही वेदना झाल्या.तरीही मी खूप आनंदी आहे.असं दाखवणारी स्त्री कवीने उभी केली आहे.तिला कधीच दुःखाची पाटी जड वाटली नाही.तिची कहाणी गाताना कवीची भूमिका नुसती दुरस्त साक्षीदाराची नाही तर

“तुझे दुःख भोगण्याचे माझ्या अंगी येवो बळ

तुझ्या अथांग गंगेचे पाणी वाहू दे निर्मळ”

महानोर शब्द घडवतात आणि ग्राम जिवनातले,बोलीतले कित्येक शब्दही चपखलपणे त्यांच्या कवितेत वापरतात.कष्टाच्या व परिस्थितीच्या दबावाखाली राहणाऱ्या स्त्रीला सरकारी योजना काय करणार तिचा कुटुंबाचा,दुःखाचा,व्यसनी नवऱ्याचा भार कसा हलका होणार म्हणून कवी लिहितात,

“कुठली आली शिक्षणाची सावित्रीबाई योजना

तिचा मोडला कणा घराचं बेठार सांभाळताना”

शासकीय योजना बऱ्याच ठिकाणी उपयोगी पडत नाही.त्या विसंगती निर्माण करतात. स्त्रीच्या सक्षमीकरणाने देशाचे नवी उभारणी करता येईल हा केवळ आशावाद असल्याचे कवी स्पष्ट करतात.दुःख,वेदना सोसणाऱ्या,एकाकी पडणाऱ्या स्त्रियांच्या जगण्याच्या या कहाण्यांमध्ये संघर्षमय स्त्रियांच्या कहाण्याही आहेत.समकालीन स्त्री जीवनाला आदर्श  ठरणारी कहाणी मेधा पाटकरांच्या रूपाने कवी मांडतो. त्या बेघरांना कवेत घेऊन उभे राहण्याचे बळ देतात.त्यांच्या संघर्षाची प्रेरणा बनते.नर्मदा आंदोलन एक कृती प्रवण सर्जनशील हक्काचा निर्देशक असा लढा होय.ही लढाई जागृत झालेल्या मनाची मानवी हक्काची पर्यावरणाची लढाई आहे. कवीचे स्त्री रूपाला समजावून घेणे म्हणजे जीवनाला समजावून घेणे होय त्यामुळेच महानोरांची कविता रसिकांच्या प्रचीतीची कविता ठरते.

‘जगाला प्रेम अर्पावे’हा  महानोरांचा कवितासंग्रह साने गुरुजींच्या जीवनावर आधारित भाव कवितासंग्रह आहे.उत्तरोत्तर अधिकाधिक चिंतनशील होत जाणाऱ्या त्यांच्या काव्यप्रवासातील हा

एक महत्त्वाचा भावसंग्रह आहे.साने गुरुजींचे जीवन त्यांचे बालपण,शिकण्यासाठी साने गुरुजी पुण्यात आल्यावर त्यांना गावाकडच्या आठवणींने व्याकूळ केले.त्यांचे मन खेड्याकडे लहान मुलांकडे,तापीकाठच्या गावाकडे ओढ घेते.त्यातून ते स्व:ताला सावरतात.लेखन,अखंड वाचन,श्रवण यातून साने गुरुजी घडत जातात. भारतीय संस्कृती ही श्रेष्ठ संस्कृती आहे.या भारतीय संस्कृतीकडून बरेच काही शिकण्यासारखे आहे.याचे चित्रण करताना कवी महानोर लिहतात.

“भारतीय संस्कृती म्हणजे अनंताकडे जावे
चिखलातून कमळाकडे जाणे
विकारातून विवेकाकडे जाणे”

साने गुरुजींच्या प्रभावी लेखनीने भारतीय संस्कृतीचे जे विशाल स्वरूप रेखाटले आहे.त्याचे आपल्या शब्दातून वेदक वर्णन महानोर करतात. गांधीजींचा खून झाला तेव्हा मासाच्या माणसाचा खून करता आला तरी गांधीजींच्या विचारांचा ,सत्याचा खून करता येणार नाही.हा विचार सेवा दलातील तरुणांना प्रकाश देण्यासाठी साने गुरुजींनी उभारलेल्या ‘साधना’ व्यासपीठावरून दिला.याच काळात गुरुजींच्या लेखणीला भर आलेला दिसून येतो.

“हजारो तरुणांचे बलदंड हात इथं एकत्र बांधूया
आंतरभारतीनं जोडू या
मग पाहू या नवी स्वप्न”

अशा शब्दात कवी महानोर यांनी गुरुजींचे मनोगत व्यक्त केले आहे.

समारोप

कवी महानोर यांनी जे स्वत: अनुभवले पाहिले त्याचेच चित्रण त्यांनी आपल्या वेगवेगळया कवितासंग्रहातून केले.कवी महानोरांचा निसर्ग सौंदर्याकडून सुरू झालेला प्रवास हळूहळू वास्तवाभिमुख झालेला आपल्याला पाहायला मिळतो.शेतकरी कुटुंबात जन्माला येऊन विविध कौटुंबिक आघात आणि दुःख पचवून कवी महानोर यांनी जे लेखन केले आणि आपल्या लेखणीने विविध कविता संग्रह लिहून मराठी ग्रामीण वाङ्मयात भर घातली ती खरोखरच वाखाणण्याजोगी आहे.त्यांनी आशय आणि अभिव्यक्तीच्या संदर्भात केलेले प्रयोग खरोखरच आगळे-वेगळे असे आहेत.त्यामुळे त्यांच्या कवितांना प्रचंड लोकप्रियता मिळाली.ग्रामीण जीवनाकडे,शेतकऱ्यांकडे पाहण्याची नवीदृष्टी त्यांच्या कवितेने

दिली.कवी महानोर यांचा मृत्यू झाला ते आज आपल्यात नाहीत पण खरोखरच कोणत्याही राजकीय दबावाला बळी न पडता अस्सल ग्रामीण कविता लिहणाराकवी पुन्हा होणे नाही. कित्येक पिढ्या येतील जातील पण महानोर आणि महानोरांची कविता नक्कीच अजरामर राहील यात शंका नाही.

संदर्भ:

१.नायकवडे राजेंद्र'महानोरांची कविता आस्वादन आणि मूल्यांकन','पद्मगंधा प्रकाशन, पुणे.प्र.आ.२००३.

२.पाटील मोहन "ग्रामीण साहित्य आणि संस्कृती", 'स्वरूप प्रकाशन,औरंगाबाद.

3. रसाळ सुधीर:काही मराठी कवी:जाणीवा आणि शैली,शारदा प्रकाशन, नांदेड.प्र.आ.१९८४.

४.देशमुख श्रीकांत.(संपा.)महानोरांची कविता,निर्मल प्रकाशन,नांदेड.प्र.आ.२०००३.

५.क्षीरसागर उत्तम( संपा.)पक्ष्यांचे लक्ष थवे,प्रस्तावना पॉप्युलर प्रकाशन,मुंबई,प्र.आ.१९९०.

६.होळकर प्रकाश:रानगंधाचे गारुड,साकेत प्रकाशन,औरंगाबाद.प्र.आ.२००८.

७. लुलेकर प्रल्हाद:मराठवाड्यातील मराठी वाङ्मयाचा इतिहास,कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद.२०१६.

८.महानोर ना.धों. 'रानातल्या कविता',पॉप्युलर प्रकाशन,मुबई,१९६७.

९. महानोर ना.धों.'वही',पॉप्युलर प्रकाशन,मुबई,१९७१.

१०. महानोर ना.धों.पानझड,पॉप्युलर प्रकाशन,मुबई,१९९७.

११. महानोर ना.धों.पावसाळी कविता,पॉप्युलर प्रकाशन,मुबई,१९८२.

१२. महानोर ना.धों. 'अजिंठा',पॉप्युलर प्रकाशन,मुबई,१९८४.

१३. महानोर ना.धों. 'गाथा शिवरायाची',पॉप्युलर प्रकाशन,मुबई,१९९१.

१४.महानोर ना.धों.'जगाला प्रेम अर्पावे'२००५,पॉप्युलर प्रकाशन,मुबई,२००५.

१५. महानोर ना.धों. 'प्रार्थना दयाघना',पॉप्युलर प्रकाशन,मुबई,१९९०.

१६. महानोर ना.धों.'गंगा वाहू डे निर्मळ',पॉप्युलर प्रकाशन,मुबई,१९९०.

१७. महानोर ना.धों. 'दिवे लागणीची वेळ,पॉप्युलर प्रकाशन,मुबई,१९९०.

*****

# भारतीय समाजात स्त्रीचे होणारे शोषण

('झिम पोरी झिम', 'भूमी' कादंबरींच्या अनुषंगाने)

प्रा. ठाणेकर बाळाताई महेंद्र
(एम.ए. एम.एड., एम. फिल.सेट,नेट.)
b.m.thanekar@gmail.com
भ्रमणभाष:७०६६९६०६६४

---

**प्रस्तावना-**

भारतीय समाजात स्त्रियांचे स्थान आणि त्यांची स्थिती यावर अनेक शतकांपासून चर्चा होत आहे. एका बाजूला भारतीय संस्कृतीत स्त्रियांना देवी म्हणून पुजले जाते, तर दुसऱ्या बाजूला, त्यांना अनेक प्रकारच्या शोषणाला सामोरे जावे लागते. हे शोषण केवळ शारीरिक भावनिक आर्थिक आणि सामाजिक स्तरावरही दिसून येते. वर्षानुवर्ष, पिढ्यानपिढ्या स्त्रियांवर अनन्वित प्रकारचे अन्याय आणि अत्याचार होत आले आहेत. स्त्री जीवन विविध बंधनांनी जखडलेले असेच आहे. पुरुषप्रधान संस्कृतीत स्त्रियांची मने दबली गेली आहेत. स्त्रिया दबलेल्या, घुसमटलेल्या, पुरुषसत्ताक व्यवस्थेत कस्पटा समान असतात. स्त्रियांनीही हे गृहीतच धरलेले असते. सोशिता वाढवणे व अन्याय मुकपणे सहन करणे यातूनच त्यांच्या स्त्रीत्वाला तेज चढते असा संस्कार स्त्री मनावर बालपणापासून होतो. कौटुंबिक आणि सामाजिक पातळीवर त्यांना एका मर्यादेपर्यंतच स्थान देण्यात येते. हा स्त्रीच्या अस्तित्वावरच घाला आहे पूर्वापार घातलेली बंधने ही तिच्याबाबत लक्ष्मणरेषा आहे. ती ओलांडण्याचे धारिष्टे तिच्यात नाही. जन्मापासून ते मरणापर्यंत आणि मरणोत्तरही समाज व्यवस्थेचे नीती नियम आणि सर्व सोपस्कार तिच्या अंगवळणी पडलेले आहे. स्त्री आणि पुरुष या दोन जीवांगाविषयी समाजात जो भेद आहे तो सनातन आहे. या भेदभावाला पोथ्या-पुराणे, दंतकथा कहाण्या वृत्तांताचा भक्कम व धार्मिक आधार दिला आहे.त्याचा परिणाम निरक्षर ग्रामीण समाजावर जबरदस्त झाला आहे.

प्रस्तुत लेखातून स्त्रीचे कौटुंबिक पातळीवरील शोषण व लैंगिक पातळीवरील शोषण 'झिम पोरी झिम' या बालाजी इंगळे यांच्या कादंबरीतून तसेच आशा बगे यांच्या 'भूमी' या कादंबरीतून स्त्रीपात्रांना कौटुंबिक पातळीवरील शोषण व लैंगिक पातळीवरील शोषण याबाबत विचार करावयाचा आहे.

**'झिम पोरी झिम'या कादंबरीतील कौटुंबिक पातळीवरील शोषण-**

बालाजी मदन इंगळे यांच्या कादंबरीत जना बलभीम जाधव या परकरी आणि शाळकरी मुलीची ही कथा आहे संत जनाबाई ला जसे विठ्ठलाच्या घरी दासी बनवून राहावे लागले तसेच दास्यत्व याही जनाला आलेले होते. तिच्या वयाच्या राधि, संगी, लक्ष्मी, बेबी, आर्ची, निलव्वा, तनुजा या मैत्रिणीची ही कथा आहे. काहींच्या घरी भाकरीची सोय आहे तर काहींच्या घरी भाकरीचा प्रश्न रोजचाच आहे. ग्रामीण

भागात पोटाचे खळगे भरण्यासाठी मोठ्या व्यक्तींना रोजगारासाठी बाहेर पडावे लागते.अशावेळी घरी उरली सुरली कामे घरातील लहान मुलींवर येऊन पडतात. जना ही त्याला अपवाद नाही. ती बाल मैत्रिणीसह दारात चिपरीने खेळत असते पण तिचे खेळात लक्ष नसते तर घरातील भांडी घासावयाची आहेत याची तिला रुखरुख असते. कामावर गेल्यानंतर लहान भाऊ शंकर याला सांभाळण्याची जबाबदारी तिच्यावर येते लहानपणी तिच्या वाट्याला चूल आणि (लहान भावाच्या रूपाने) मुल येते. त्याचा सांभाळ करण्यासाठी तिची आई तिला शाळेत जाऊ देत नाही आई म्हणते,"शाळा शिकून तुला का कुठं दिवं लावाया जायाचं नाही." १.

जनाच्या आईचा संसार ओढग्रस्त आहे. संसार कसा चालवावा हा तिच्यापुढे मोठा प्रश्न आहे जनाला शिक्षणाची अनामिक ओढ तर आईला जनाचे शिक्षण बंद करून घराला मदत करण्याचा ध्यास. आज जागतिकीकरणाच्या युगात देखील उमलत्या वयातील मुलींना केवळ  शिक्षणा सारखी प्राथमिक गोष्ट प्राप्त करण्यासाठी कुटुंब आणि समाज याबरोबर लढा द्यावा लागतो. जनाला बाईपणाची वागणूक पदोपदी होते. शंकर हा मुलगा असल्याने त्याला दूध खाऊ घातले जाते पण एखाद्या दिवशी जनाने दुधाची अपेक्षा केली तर मुलगी म्हणून तिची उपेक्षाच होते.,"जनाची आई जनाला म्हणते, "दूध-तूप खाऊन तुझा का इथे वस वाढायचा नाही. पोरीच्या जातीला का कराय चाय चांगलं वंगळं. ताटात असेल ते खायचं खाऊन मोठी पडशील आणि दुसऱ्याच्या घरी जाऊन बसचील".२. यावरून कुटुंबामध्ये मुलीकडे पाहण्याचा  दृष्टिकोन भेदभाव  करणारा आहे हे लक्षात येते.

आपली मुलगी वयात आली हे समजतात तिला कसं वागायचं याच्या शिक्षण तिची आई तिला देते आहे ती सांगते,"धाड- धाड माणसा वनी चालायचं सोडून दे पंजाबी ड्रेस घाल. "सगळं आंग झाकून घे कुण्या पोराला बोलायचं नाही. कोणाला आपला अंत द्याचा नाही".३.

स्त्रीमनावर बालपणापासून संस्कार असतो स्त्री म्हणून शोषितेने वागले पाहिजे मनातले मनात दडपून टाकायला त्याने शिकले पाहिजे मनातले ओठावर कधी आणायचे नाही या संस्कारामुळे स्त्रीचे आयुष्य पिचून जाते.

**लैंगिक पातळीवरील स्त्रियांचे शोषण** -

या कादंबरीत स्त्रियांचे लैंगिक शोषण होताना दिसते. जनाची मैत्रीण लक्षी हे संसारात सुखी आहे. पण तिचा नवरा मनमानी आहे तिच्या मनाविरुद्ध शरीर संबंध ठेवतो तर राधेचा नवरा जबरदस्ती करतो. तिचा नवरा संशयी वृत्तीचा आहे. राधीचा नवरा कसलातरी औषध आणतो आणि खातो आणि आपल्या बायकोला त्रास करतो तिचे लैंगिक शोषण करतो. विवाह मुळे शरीरसंबंधाला समाज मान्यता मिळते परंतु कधीकधी स्त्रीच्या वाट्याला हा शारीरिक हिंसाचार होतो. इज्जतीसाठी लैंगिक शोषण सहन केले जाते शाळेत असताना कावळे आडनावाचे शिक्षक शिक्षा देण्याच्या निमित्ताने  पाटीत मारतात  व छातीवरून हात  फिरवतात हा लैंगिक शोषणाचा नमुना आहे.

शरीर संबंधाविषयी जनाच्या भावना या हळुवार आहेत. पण तिचा नवरा तिचे स्वप्न उद्ध्वस्त करून लावतो. जनाचा स्त्री पुरुष संबंधातील अनुभव क्लेशकारक, अप्रिय असा आहे. बी.ए. बी.एड.

झालेल्या नवरा नामक पुरुषाची संवेदनशून्यता, एकांतातील कौर्य, संशयीवृत्ती जनाला सहन करावी लागते.

जनाचे जीवन असो की तिच्या मैत्रिणीचे जीवन असो, पुरुषकेंद्री व्यवस्थेत स्त्रीला केवळ उपभोगाचे, प्रज्योत्पादनाचे साधन ठरविले आहे स्त्रियांच्या शारीरिक व मानसिक शोषणाचे मार्ग आजही पुरुष केंद्रे व्यवस्थेला खुले राहिले आहेत. समाज व्यवस्थेने निर्मिलेल्या भयामुळे स्त्रिया दडपून गेल्या आहेत. परकरी शाळकरी मुली पुरुषी व्यवस्थेच्या भोगवादी व्यवस्थेच्या बळी ठरल्या आहेत. कधी गावातील उनाड पोरं कधी कावळे मास्तरासारखे डोमकावळे त्यांच्यावर त्यांच्या चारित्र्यावर त्यांच्या जगण्यावर घाव घालतात या सर्व व्यक्तीने स्त्रिया आत्मनिर्भर आणि आत्मनिर्भय होत नाहीत हे वास्तव भयावह आहे. स्त्री जीवन काळोखाचे ठरते ते यामुळेच.

आशा बगे यांच्या भूमी कादंबरी मधून स्त्री जीवनाच्या आलेख चित्रित होतो .तिच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होत जातो. त्याचवेळी तिच्या कुटुंबाशी चाललेला संघर्ष ही तितकाच प्रभावीपणे व्यक्त होतो

ती ज्या कुटुंबात जगत असते तिथे मात्र तिच्या जगण्याला मर्यादा पडतात तिच्या भावना समजून घेणारा जोडीदार तिला मिळत नाही. कादंबरीत प्रमुख व्यक्तिरेखा असलेली मैथिली व तिचा पती शंतनु या दोघांच्या मध्ये संशयाचे वातावरण तयार होते. संघर्ष निर्माण होतो. विश्वासाचा पायाच खचतो. विसंवाद वाढतो. तिचा मानसिक कोंडमारा होतो. एकप्रकारे तिचे कौटुंबिक पातळीवर शोषणच होताना दिसते.

**कौटुंबिक पातळीवरील शोषण :**

स्त्रीवादाचे एक महत्त्वाचे गृहिततत्त्व असे आहे की, स्त्रीला कौटुंबिक व सामाजिक अशा दोन्ही पातळ्यांवर होणाऱ्या शोषणाची जाणीव असणे व हे शोषण थांबवणारी व त्याला वैचारिक अधिष्ठानाने आव्हान करणारी भूमिका घेणे. 'भूमी' मध्ये जहाल स्त्रीवाद नाही, पण पुरुषाइतकेच महत्वाचे व समान स्थान अपेक्षिलेले आहे. स्त्रीला मिळणाऱ्या दुय्यमत्वाने अंतर्मुख होणारी पण परंपरेला तीव्र विरोध न करणारी मैथिली या अर्थाने जहाल स्त्रीवाद इथे दिसत नाही. आत्या, मैथिली, वासुकी, जानकी आंटी, कीर्ती या 'भूमी' मधील स्त्रियांचे कौटुंबिक पातळीवर शोषण होते. चिनू आणि जानकी आंटी या स्त्रिया सोडल्या तर बाकी सर्व व्यक्तिरेखा शोषणाबद्दल कडवट प्रतिक्रिया व्यक्त करतात. वैवाहिक जीवनात अस्वस्थ पण तरीही कीर्ती सोडून बाकीच्या स्त्रिया दुःखी मनःस्थितीतच आपले आयुष्य ढकलतात.

मैथिलीला कौटुंबिक पातळीवर समान स्थान नाही. शंतनू आणि मैथिली यांचा विवाहच तीव्र टोकदार नकार घेऊन झालेला असतो. मैथिलीला विनासंघर्ष यश मिळते असा शंतनूचा गैरसमज असतो. त्यामुळे मैथिलीबद्दल द्वेष व स्वतः बद्दल न्यूनगंडाची भावना त्याच्या मनात निर्माण होते. एका ड्रिंक पार्टीत शंतनू आपल्या भावना बोलून दाखवतो मैथिलीच्या अस्तित्वाने त्याला गुदमरायला होते. मैथिलीला विश्वासात घेऊन महत्त्वाचे निर्णय घ्यावेत असे त्याला वाटत नाही. कुटुंबनियोजनाचे ऑपरेशन, नोकरीचा राजीनामा देणे, नवीन घर घेणे या सर्वच बाबतीत तो मैथिलिला अंधारात ठेवतो हे कौटुंबिक पातळीवरील मैथिलीचे शोषणच होय.

मैथिलीच्या आत्याच्या मनाची तर खूप वेळा घुसमट होते. प्रसंगपरत्वे आल्या आपले मन मैथिलीकडे व्यक्त करते. मैथिली शंतनू विवाहाच्या निमित्ताने चर्चा करताना आत्या आणि गोपाळराव यांच्यातील वयाच्या अंतराचा उल्लेख मैथिली करते. तेव्हा आत्या म्हणते, "हो, अकरा वर्षांचं. पण आमचा काळ वेगळा होता ग. मुलगी मुलापेक्षा लहान असं ठरलेलंच होतं. पण हे कोण ठरवत होतं ग! उरवणारे कोण होतं? मुलगी लहान असली की शेवटपर्यंत यांच्या सेवेला बरी, असेच हिशेब असतील! बायोलॉजिकली असं काही नाही."४. पुढे ती आपले मन मोकळे करताना असेही सांगते, "आम्हाला नव्हतीच निवड. स्वतःकरता स्वतःच्या बाजूनं आम्ही नाहीच पाहिलं कधी. तुमचं तसं नाही."५.

अंशुमनच्या जन्मानंतर आत्या मैथिलीकडे येते तेव्हा बोलण्याच्या ओघात मैथिलीला आत्या म्हणते, "तुला सुख लागावं असं वाटतं. बस्स. नवरा आणि मैथिली, लग्न, घर, मुलं या सगळ्या गोष्टी कुणी तरी प्रथम ठरवल्याच असतील नं! त्या काही बाईकरता नाही ठरवल्या! ती या सर्वात गळाभर गुंतलेली, पण पाहुणी म्हणूनच नं!" ६ आत्याला तिच्या घरात सन्मानाचे स्थान नव्हतेच. कोणतेही निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य तिला नव्हते. आपला सगळा जन्म भिण्यात गेला याची खंत तिच्या मनात असते.

सामाजिक परिस्थितीतही स्त्रीला प्रस्थापित व्यवस्थेने कसे जखडून टाकले आहे याचे चित्रण 'भूमी' मध्ये येते.

**लैंगिक पातळीवरील स्त्रियांचे शोषण -**

मैथिलीची आई अम्मा ही नवऱ्याच्या मृत्युनंतर मॅथ्युज या व्यक्तीकडे एक आधार म्हणून पाहते. आर्थिक दृष्ट्या ती स्वतःच्या पायांवर उभी असते, मॅथ्युज हा मैथिलीच्या आईबरोबर नाजूक संबंध ठेवतो. ती आजारी असताना तिचे आर्थिक व्यवहार पहात असता तिला फसवतो. मैथिलीची जबाबदारी घेणे टाळतो.

आईच्या मृत्युनंतर मैथिली मुंबईला आत्याकडे रहावयास येते. आत्याचा सावत्र मुलगा उदय चार दिवस सुट्टीसाठी येतो. मैथिलीकडे आकृष्ट होतो. तिच्या शरीराला जसा स्पर्श तो करतो त्यातून त्याची वासनांध वृत्ती लक्षात येते. एवढेच नाही तर तो तिच्याबरोबर प्रणयासाठी दोन तास लॉज बुक करायचे ठरवून तिला तसे सांगतो. विवाहापूर्वी (खर म्हणजे विवाह ठरलेलाच नाही) तिच्यावर अशी बळजबरी करण्याचा विचार त्याच्या मनात येणे हे इथले समाजवास्तव आहे.

आत्या, गोपाळराव, बीना हे उदयच्या लग्नासाठी मध्यप्रदेशात गेलेले असताना संजू देखील मैथिलीवर अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न करतो. "त्या उदयनं घुमवलं तर चालतं. हॉटेलमध्ये दोन तास त्याच्यासोबत घालवलेस तर चालल! तुला...तू..."७. या त्याच्या बोलण्यात मैथिली म्हणजे फक्त एक मादी हा दृष्टिकोन दिसतो. उदय जर शरीरोपभोग घेऊ शकत असेल तर मला विरोध का? हा त्याचा प्रश्न आहे. नेमके वास्तव त्याने समजून घेतलेले नाही. उदयला मैथिलीने प्रतिसाद दिलेला नाही, की ती त्याच्या स्वाधीन झालेली नाही. पण इतक्या खाजगी गोष्टी उदय आणि संजूमध्ये बोलल्या जातात. स्त्रियांसाठी असणारी जीवनव्यवस्थाच इथे उदय, संजय सारख्यांच्या पथ्यावर आहे हे समाजवास्तव इथे प्रकट होते.

शंतनू इंजिनिअरींगच्या पहिल्या वर्षी फेल झाल्यावर ड्रगच्या आहारी जातो, घरातून पळून जातो. या पडझडीच्या काळात दांडेकरांची खूप मदत होते. पण दांडेकर साधा माणूस नसतो. त्याची सगळी किंमत

तो पुरेपूर वसूल करतो.. दांडेकर देवस्थळीबाईशी असलेले स्नेहाचे नातेच बदलून टाकतात. पण त्यामुळे देवस्थळीबाईंचे घर उद्ध्वस्त होते. शंतनू तर आयुष्यातून उठतो. मदत निरपेक्ष भावनेने नाही. यातून स्त्रीकडे पहाण्याचा पुरुषी दृष्टिकोन दिसतो.

शंतनूची नोकरी जाते. त्याने परत नोकरी करावी म्हणून मैथिली तिचे गाईड डॉ. अरूणाचलम् यांना भेटते. तो प्रसंगही शोषणाचा दर्शकच आहे. तो प्रसंग असा; डॉ. अरूणाचलम हसले त्यांनी वळलेल्या मैथिलीच्या खांद्यावर हात ठेवला. मग पाठीवर थोपटल्यासारखा तो तिथंच रेगांळू देऊन थोडासा दाबलाही. मग दुसराही हात खांद्यावर ठेवला. मैथिली क्षणभर खिळल्यासारखी झाली. तिनं स्वतःला आक्रसून घेतलं, वयात बाप-लेकीसारखं अंतर, पण हा स्पर्श पुरुषाचा होता. मैथिलीला त्यांच्या अशा या स्पर्शाची सवय झाली होती. तिला आणि त्यांच्या सगळ्या विद्यार्थिनींनाही. अरूणाचलमही त्या स्पर्शापलीकडे कधी गेले नाहीत, स्त्रीच्या त्या स्पर्शाची लालसा ही त्या विद्वान माणसाची विचित्र मर्यादा दिसून येते.

आयुष्यात न भिता आत्या फक्त एकच गोष्ट करते ती म्हणजे, सगळयांचा विरोध पत्करून मैथिलीचा सांभाळ करायचे ठरवते. जान्हवी आत्याचेही कौटुंबिक पातळीवर खूपच शोषण झालेले असते. पण आपल्या शोषणाची तिला जाणीव असते. त्याबद्दल अंतर्मुख होऊन ती विचार करते हा सोशिकपणाच होय.

बेंगलोरला आल्यानंतर सुभद्रा जोशीच्या मदतीने मैथिली वासुकीच्या घरात रहायला येते. वासुकीने खूप लहान वयात पळून जाऊन लग्न केलेले असते. नवरा दुबईला असतो. मुलांना आणि सासूला घेऊन ती बेंगलोरला रहात असते. महिनाभराच्या सुट्टीवर जेव्हा वासुकीचा नवरा येतो तेव्हा वासुकी मैथिलीशी बोलत नाही, नवरा दुबईला गेल्यावर मैथिलीला घर सोडण्याचा नवऱ्याचा निरोप सांगते. वासुकीला या गोष्टीचे खूप वाईट वाटते. तिचे डोळे भरून येतात. ती उसळून नवऱ्याचा खोटेपणा सांगते.
"तुम्हाला म्हणतात आणि हे! मल्लेश्वरला एक बाई आहे तिथं जातात. त्यांचे फोन चालतात अर्धाअर्धा तास. मला मात्र फोन पंधरा-वीस दिवसातून एकदा. त्यावर मुलांची चौकशी, त्यांच्या आईची विचारपूस. मुलांना मार्क कमी मिळालेले चालत नाहीत. तू रिकामी काय करतेस; म्हणतात मला नेऊ शकत नाहीत तिकडे! त्यांना मला न्यायचंच नाही आणि गोष्टी सांगतात. एखाद्या वर्षी बँकेत घरच्याकरता जास्त पैसे भरतात, त्या वेळी माझा जीव घाबरतो. वाटतं, मला ते या नोटांत जिवंत पुरतील. या नोटांत, या त्यांच्या घरात, त्यांच्या मुलांत, आईत. त्याकरता ही सोय. अक्का, तुम्ही नका जाऊ रहा बघू देत तर काय करतात ते! एवढं न ऐकण्याचं तर स्वातंत्र्य आहेच मला!"७. वासुकीचा हा संताप अत्यंत सात्विक आहे. नवऱ्याचा बाहेरख्यालीपणा, त्याच्याच दबावाखाली राहणे तिला अवघड जाते. आपल्या स्वातंत्र्यावर गदा येणे तिला रूचत नाही. वासुकीची व्यथा जितकी अंतर्मुख करते, तेवढेच तिचे "एवढं न ऐकण्याचं तर स्वातंत्र्य आहेच मला !" हे उद्गारही अंतर्मुख करतात. कौटुंबिक पातळीवर सन्मानाचे समान स्थान राहूदे पण अत्यंत शुल्लक निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य स्त्रिला असू नये, इतके क्षुद्र तिला मानावे हे एका परीने कौटुंबिक पातळीवरील शोषणच होय.

धर्मराजन यांच्या घरात शंतनू-मैथिली रहात असतात. घरमालक आणि भाडेकरू असे नाते त्यांच्यात नसते मोकळेपणाने गप्पा मारणे, एकमेकांच्या अडीअडचणीला मदत करणे असे संबंध त्यांच्यात होते.

धर्मराजन आपल्या पत्नीवर नितांत प्रेम करीत होते. पण धर्मराजन यांनी मृत्युपत्रात घर मात्र मुलाच्या नावावर केलेले असते. त्यामुळे धर्मराजन यांच्या मृत्युनंतर ते घर विकायचे मुलगा ठरवतो आणि चिनू धर्मराजन यांना मुलाबरोबर जावे लागते. हेही कौटुंबिक पातळीवरील शोषणच आहे. कित्येक वर्ष ज्या माणसाच्या सहवासात ती बाई राहिली त्या बाईला त्याच्या मृत्युनंतर हक्काची टिचभर जागा मिळू नये? परदेशात चिनुला करमत नाही म्हणून स्वतःच्या घरात राहणारे धर्मराजन आपल्या मृत्युनंतर बायकोसाठी घरही ठेवत नाहीत. धर्मराजन स्वतःचे आयुष्य जगले, निवड त्यांनी स्वतःकडे ठेवली पण बायकोचा कुठे विचारच केला नाही. स्त्रियांचे अशाही पद्धतीने कौटुंबिक पातळीवर शोषण होते हे 'भूमी' या कादंबरीत दिसून येते.

**संदर्भ:**

१) इंगळे बालाजी मदन-झिम पोरी झिम-जनशक्ती वाचक चळवळ प्र .आ.२००९ पृष्ठ ५२.

२) तत्रैव-पृष्ठ ६२

३) बगे, आशा-भूमी-मौज प्रकाशन गिरगाव-प्र. आ.२००४ पृष्ठ ४५

४) तत्रैव पृष्ठ-१५७

५) तत्रैव-पृष्ठ-११३

६) तत्रैव -पृष्ठ-११३

७) तत्रैव-पृष्ठ १३०

*******

# भटके विमुक्त स्त्रियांचे वर्तमान

**प्रा. विनायक विलास सरदेसाई**

मोबा.: ७३५०५२६९५०

---

**स्त्री वेदनेचा भटका हुंकार** शिक्षणाच्या संहितेतून आत्मभानाच्या विचारशलाका निर्माण करणे. तथागत बुद्धाच्या सम्यक तत्त्वज्ञानात स्त्रियांच्या धार्मिक व जातीय वेदनेचा अंत असून धर्मांतर करून मनुवादी धर्म जोखडातून मुक्त होण्यासाठी वैचारिक आणि मानसिक पाठबळ या तत्त्वज्ञानात आहे. अखंड स्त्री विश्वाच्या विद्रोहाला आत्मभान येण्याचे सौख्य तथागत बुद्धाच्या सम्यक दृष्टीत आहे. धर्मांतर हे वर्तमानकालीन परिवर्तनाचे द्योतक आहे. स्त्रियांना माणुसकी प्राप्त संघटना, समता, स्वातंत्र्य प्राप्त करायचे असेल तर धर्मांतर करणे. कारण हिंदु धर्म स्त्रियांना उपेक्षितच ठेवतो.

स्त्रीयांच्या प्रतिष्ठेची गळून पडलेली बंधने झुगारून मानवतावादी दृष्टीकोनातून जीवन जगणे. स्त्रीयांच्या माणुसपणावर बाधा आणणाऱ्या धर्म संस्कृतीला हादरे देऊन धर्मांतर करणे हे वर्तमानातील परिवर्तन असेल.

## प्रस्तावना

गावकुसाच्या बाहेरील जो समाज उपजीविकेसाठी सतत भटकंती करीत जीवन जगणारा समाज म्हणजे भटका-विमुक्त समाज असे म्हणता येईल.

आधुनिक काळात त्याला पालावरचे जग म्हणतात. भटके म्हणजे परदेशी, परके किंवा चोर भामटे अशा दृष्टीनेच पूर्वीपासून गावगाड्याने त्याच्याकडे पाहिले. तशी त्यांना वागणूक दिली. याचा परिणाम असा झाला की भटक्या जमातीचे लोकजीवन किंवा संस्कृती गावगाड्याच्या परिघा बाहेरचे भटक्या विमुक्त जमातींचा गावगाड्याशी

केवळ निमित्त मात्रच संबंध आला, भटकत भटकत रिकामी जागा ज्या माळरानात दिसेल तिथे चुल मांडुन पाल टाकुन चुल मांडण. भटक्या जमातींचा स्वत:चा असा पारंपारिक व्यवसाय होता. अशा जमाती गावगाड्याशी निमित्ताने गावगाड्यांशी संपर्क ठेवुन राहिल्या.

देशातील एकूण १९२ तर महाराष्ट्रातील १४ जमाती इंग्रजांनी गुन्हेगार ठरविल्या. भटकंती व्यवसाय करणाऱ्या, शारीरिक कष्टाची कामे करणाऱ्या जमातींमध्ये आहेत. **कलावंत जमाती :** गोंधळी, वाघ्या-मुरळी, जोगती, जोगतीणी, मिराआईवाले, भोपे, गोसावी, बैरागी, पशुपालक जमाती, गोपाळ, दांगट, डवरी इत्यादींचा कलावंत जमातीमध्ये समावेश होतो तर,**भविष्य सांगणाऱ्या जाती** : ठोकेजोशी, मेंढगी तिरमाळी कुडमुडे जोशी, वासुदेव, मनकवडे, पिंगळा जोशी, डमरूवाली जोशी सरोदे.

**शिकार करणाऱ्या जमाती :** डोंबारी, कोल्हाटी, मदारी, गारूडी, नंदीबैलवाला, दरवेशी, रायरंद, बहुरूपी, कुठपुतळीवाला, माकडवाला, मारवाडी या कलावंत जाती आहेत. पारधी भिल्ल, फासे पारधी, चिल्हार पारधी, हरण, पारधी, वैदू व्यवसाय करणारे छप्परबंद शिकलगार, कैकाडी, वडारी, कुंचकोरवी कुंजार, वाघरी, बेलंद, घिसाडी, काशीकापडी, ओतर, गाडीलोहार, वैदु (राजवाडे आदिवासी), स्मशान जोगी.

**जातींच्या मागल्या जमाती :** डक्कलवारे (मातंगाचे मागणे) रायरंद (महाराचे मागते) शारीरिक कष्टाची कामे, वडार, लमाण, बेलदार.

**अन्न उपजिविका करणारे :** कांजारभाट, पारधी, रजपुत इ.

भारत एकीकडे महासत्ता होण्याचे स्वप्ने बघत आहे. ज्या देशाने आपल्या स्वातंत्र्याची साठी पार केली त्याच देशात आजही दिन-दलित आदिवासी भटक्या विमुक्त जाती आपलं बिऱ्हाड पाठीवर घेऊन फिरत आहेत. चतकोर भाकर आणि वित्तभर जागेसाठी गावोगावी स्थलांत्तरित होणाऱ्या भटक्या विमुक्त जातींचे दु:ख विशेष स्त्रियांचे वर्तमानातील आरिष्ट्यै वास्तवजग डोळ्यासमोर आहे. हे जाणून घेण्याचा चिंतनात्मक विचार आहे.

भारतामध्ये पूर्वीपासूनच जातीयतेची उत्तरंड आहे या उतरंडीतूनच जातीय भेद निर्माण झालेले आहेत. हे भेद जातियव्यवस्थेला प्रखर कडवटपणा देणारे आहेत. कडवटपणा जरी कमी झाला असला तरी समाजातील तत्ताकथित उच्च वर्णियांची मुजोर वर्गशाही आजही अबाधित आहे. याचे खरे तर प्रत्त्यंतर येते ते विविध भटक्या विमुक्त जमातींच्या वेदनेतून....त्याच्या युगान युगांच्या दु:खातून

कोणी यांच्या पाठीवरती हे बिऱ्हाडं लांदले....?

धर्माच्या नावावर यांच्या मानगुटीवर नियमांचे हजारो मन

ओझे कोणत्या आधाराने ठेवले ......?

जातीय उत्तरंड कशी व्यवस्थेत आली.... हीन दलित?

स्पृश्य-अस्पृश्य, सुड अशी रचना कोणत्या समाज व्यवस्थेने केली? या समाज व्यवस्थेची मानसिकता कोणत्या मुळीतील आहे हे जाणून त्याचा यशोचित्त असा समाचार महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घेतलेला आहे. मनुवादी विचारसरणी स्त्रियांना दुबळ्या करण्यातच तीची मानसिकता आहे.

शतकानुशतके धर्माची गुलामी करणाऱ्या आपल्या त्याच्या ऱ्हासांचा जराही पत्ता लागू नये. अशी यांची मनोभूमिका आहे. देशातील ही समाजरचना केवळ वर्णजातींच्या उत्तरंडीपूरतीच मर्यादित राहिली नाही. तर ती वर्णजातीच्या तथाकथित प्रतिष्ठेवर किंवा जात क्रमानुसार स्त्रियांची प्रतिष्ठा आणि दर्जा मानणारी ठरली.

भारतीय समाज हा अनेक धर्मपंथ आणि जातिपोटजातींच्या लोकांचा समूह आहे. या देशातील प्रत्येकजण ही वेगवेगळा आहे. जाति-पोटजातींचे लोक जीवन हे निरनिराळे आहे. एका जातीचा दुसऱ्या जातीशी थेट संबंध नाही. पण स्त्री म्हणून प्रत्येक जाती-जमातींच्या समाजातील स्त्रियांचे प्रश्न हे एकाच स्वरूपाचे असल्याचे जाणवते. कारण आपल्या संस्कृतीमध्ये स्त्री ही नेहमीच उपेक्षित राहिली आहे. तिच्या **आत्मिक मनाचा विचार आणि मानसिक उद्धवस्थेची** कारणे या **मनोवादी संस्कृतीमध्ये मूळ धरून** आहेत. या संस्कृतीतील स्त्रियांच्या विरूद्ध असणाऱ्या सर्व प्रथा या भारतीय संविधानाने

मोडीत काढल्या आहेत. याच संविधानाच्या आधारावरती अनेक जाती-जमातींच्या स्त्री मनोविश्वाला बळ देण्याच काम करत आहेत. प्रत्येक जातीतील व्यक्ती स्वत:ची जात इतर जातीपेक्षा वेगळी आहे आणि श्रेष्ठ मानते त्यामुळे या **देशात जातिअंतर्गत समानतेची, बंधुभावाची एकात्मतेची भावना निर्माण होऊ शकलेली नाही** ज्या चार्तुवर्ण्य समाजरचनेमुळे आणि कर्मविपकाच्या सिद्धांतामुळे भारतीय समाजाचे विघटन झालेले नाही. हा वर्तमानातील स्त्री जाणिवांच्या विषयी किंवा स्त्रियांच्या मनोविश्वाविषयी वास्तव जीवन विश्व आहे.

लोकशाही, समाजवाद व निधर्मदृष्टी ही जी तीन घटनेतील नवविचारमूल्ये आहेत त्यानुसार या सर्वांनी अस्पृश्यतेचे खंडनच केले पाहिजे. सर्वजणांकडून याची अपेक्षा करणे मुक्त आहे. **कारण भटके विमुक्त बहुजन आदिवासी दलित्तेत्तर हा केवळ धर्माचा प्रश्न नव्हे तर तो राष्ट्रीय प्रश्न आहे.** मानव मुक्तीचा प्रश्न आहे.

स्त्री मुळातच संवेदनशील असते. अगदी तिच्या बाजूला जराजरी खड्ट वाजल तरी ती विचलित होते किंवा एखादी घटना, चर्चा, चळवळ साहित्य तिच्या समोरच घडत असते ती या अनेक गोष्टींची साक्षीदार असते. जन्मापासून मृत्यूपर्यंत अनेक घटनाक्रमांचे विवछेदक दृश्य हे तिच्या मनोपटलावरती कायम स्वरूपी कोरलेली असतात. अशावेळेस तिच्या संवेदनाच्या पातळीवर ती या साऱ्या अनुभवाने आपल्या विचार विश्वाशी जीवन अनुभवांशी कशा रितीने बांधू पाहते ही मुख्य भूमिका स्त्रियांच्या डोळ्यासमोर असते. भटक्या विमुक्तांच्या किंवा बहुजनांची नवी विचार मूल्ये यांच्या जगण्यातून समोर आलीत का या संदर्भाने विचार केला पाहिजे.

धर्माच्या चुकीच्या समजूतीने स्त्रिला परिघाबाहेर टाकले आणि पुरूषीअहंकाराने व माणसानेही तेच केले. भटके विमुक्त जमातींच्या समाजामध्ये स्त्रिविषयक भयानक रूढी जात-पंचांनी करून ठेवलेल्या आहेत. अजूनही उपेक्षित स्त्रियांच्या बाबतीत प्राण-प्रतिष्ठा स्त्रियांच्या दुय्यमत्त्वाची प्रचिती येते. पतिधर्म व आपले चारित्र्य प्राणपणाने जी जोपासते ती स्त्री धर्माने लादलेल्या चौकटीमध्ये आपले जीवन ती कंटथ राहते.

या **बंधामुळेच देशातील अस्वस्थ जाती पोट-जातिंचे समूह हजारो वर्षे वेगळेपणाची भावना जपत राहिली,** स्त्रियांचे आत्मअनुभव स्त्रिया स्वत:च्या अस्तित्त्वाचा विचार खूप सशक्तपणे मांडतात. पुरोगामी महाराष्ट्राने अनेक परिवर्तने पाहिली. प्रबोधन चळवळींच्या रूपाने कित्येक नव्या विचारप्रवाहांना आपल्या उदरात घेतले. म्हणून धर्माच्या पारंपारिक चौकटी मोडून स्त्रीया परिवर्तनवादी सशक्त जीवन जगू लागल्या.

**भटके विमुक्त स्त्रीयांची जिवन संघर्ष**

भटक्या-विमुक्त जातीतल्या स्त्रीया समाज रूढी परंपरा आणि अत्यंत कर्मठ धर्म व्यवस्थेत रूतलेल्या अजुनही आढळून येतात. धर्माच्या गुलामगिरीमध्येच त्या अडकून आहे. शैक्षणिक परिघापासून अनेक युगे दुर असल्याने गुलामगिरीतच अनेक काळ लोटले. स्वत:च्या जीवन जाणिवांविषयी आत्मिक चिंतन न झाल्याने तिष्ठत जिवन जगणे हे येथील स्त्रीयांचे आयुष्य आहे. भटक्या जाती-जमातीतल्या स्त्रियांचे हाल तर शब्दात व्यक्त न करता येणारे आहे. गावो-गावी पालासोबत भटकणाऱ्या या स्त्रियांना रस्त्याच्या बाजुला झाडाचा आसोडा घेवुनच मुल जन्माला घालावी लागतात. जवळ पैसा नसल्यामुळे वैद्यकीय सेवा तर त्याच्या आवाक्यातच नाहीत. पुष्कळदा हा आडलेल्या बाईला अतिवेदनेमुळे मृत्यु ला जवळ करावे लागते हे मुलांना जन्म देणाऱ्या बायांना नवजात शिशुना कुठल्या प्रकारची खाण्याची व्यवस्था नसते. माळ दिसेल त्या ठिकाणी तीन दगडांची चुल घालून संसार करायचा हे येथील भटक्या स्त्रीयांचे वास्तव व कष्टप्रद श्रमिक जीवन आहे.

या अनेक समस्यांचे मुळ अज्ञान-अंधश्रद्धा अशा स्त्रीयांचा शिक्षणाचा अभाव असल्याचे आढळते. सामाजिक व आर्थिक विषमता, गरिबी, बेकारी, महिला व वंचित-शोषित समाजावरील अत्याचार जात संघटना आणि सामाजिक समस्या ह्या जमाती असंघटीत असल्याकारणाने सामाजिक प्रश्नाची सोडवणूक होत नाही.

विविहतेचा छळ छळ कुणाचा! स्त्री म्हणून जन्माला आलेल्या प्रत्येक सजीव जीवाला ! नाटक, गरज, सहन करावा लागतो. भारतातील महिला सबलीकरणाचे वास्तव आता सामाजिक क्षेत्रात महिलांना अनेक संधी उपलब्ध करू दिल्या. गेल्या योजनाची अंमलबजावणी करण्यात आली. स्वयंपूर्ण व स्वावलंबी बनविले पण. ज्याच्यासाठी हे सबलीकरण केले गेले. त्याच स्त्रीया यापासून वंचित राहिल्या.

आरोग्याचा प्रश्न गंभीर आहे. स्थिरस्थावर कुटुंबे नसल्याने आरोग्य, सुविधा, राहणीमान, स्वच्छता यांना इथे स्थान नाही हे दिसून येते. सद्यस्थितीला या जमातीमध्ये स्त्रीया अजून छळाला बळी पडतात, स्त्रीभृण हत्या घडतात. वेश्याचे बदलेले स्वरूप, महानगर बकाली, जागेचा प्रश्न आणि जगण्यातील पावलोपावली भटकंती हे अजुनही भटके जमातीतील स्त्रीयांना या समस्याचे आव्हान करावे लागते.

इथे एक गोष्ट नमूद करावी वाटते की, वर्तमानातील भटक्या जमातीतील स्त्रीयांची या जागतिकीकरणामुळे पुढील काळातील वैशिष्ट्ये उभी आहेतच. पण ती या व्यवस्थेने स्त्री म्हणून स्वातंत्र्य करून दुबळे केले आहे.

## स्त्रीयांची वर्तमानातील भूमिका

एकोणीसाव्या शतकातील जुन्या नव्याचा संघर्ष या कारणाबरोबरच परंपरा, रूढी याच्यामध्ये रूजलेल्या मनाला नैतिकतावादी विचार, जीवनमुल्ये, जिवनपद्धती दिसत आहेत. यातून स्त्रीयांच्या बदलत्या नव्या आपेक्षा, नवी भूमिका रूजू पाहत आहेत.

भटक्या विमुक्त जमातीतील जातपंचायतीचे उच्चाटन करणे. स्वतःच्या विचारामध्ये आत्मभान येण्यासाठी एकांत जीवन आणि स्थीर वास्तव्य मिळणे. उपेक्षीतांचे जीवन जगून जगण्यातील उदासिनतेचे भटक्या स्त्रीयांच्या वर्तमानातील सर्वांगीन जिवनाचे विविध पैलू. जगण्याचे आयुष्य अनुभवते.

गावगाडाच्या आणि प्रस्थापिताच्या दृष्टीने. अस्पृश्य आणि पिढ्यान्-पिढ्या

जळत्या प्रेताच्या धगीने होरपळून गेलेला भटका–समाज आता भविष्य काळ विसरून सन्मान जगणे. शिक्षणआरोग्य व उपजीविकेची सोय होईल त्याच ठिकाणी स्थिरस्थावर राहणे.

## स्त्रीयांची वर्तमानातील भूमिका

युगान युगे लादलेली भटकंती स्थीर करणे उपजीविकेसाठी गावामध्ये स्थिरस्थावर राहणे. आधुनिक जीवनशैली, समाजरचनेमध्ये सन्मानाने राहणे, श्रमिक कामाव्यतिरीक्त कार्यालयीन सेवांमध्ये अथवा शैक्षणिक स्तरावरील कामे मिळणे. आत्मभान येण्यासाठी मानसिक व शारीरिक उसंत मिळविणे.

गृहिताकडे जाण्याआधी येथे एक गोष्ट अगत्यपूर्वक उल्लेख करावा लागतो. आज भटक्या स्त्रीयांना भटकंती करून पाल टाकुन राहणे, संसाराची ओढाताण सहन करत मुलं शिक्षणापासून वंचित ठेवणे. वेशी बाहेरचे उपेक्षीत जीवन नको हे येथील स्त्रीला तथागत बुद्धाच्या सम्म्यक मार्गाने नैतिकतेचे जीवन जगण्याची कला डॉ. आंबेडकरांच्या विचार प्रणालीवर आपणास करून हे समाजपरिवर्तन भटके–विमुक्त आदिवासी बहुजन स्त्रीया यांना पाहिजे आहे. कारण स्त्रीयांना सन्मानाने जीवन जगण्याचे अधिकार याचं विचार प्रवाहातील व आत्मचिंतनात आहे.

स्त्रीयांच्या या आत्मभानासाठी म. फुले, डॉ. आंबेडकरांच्या समाजचिंतनाच्या विचारातून भगवान तथागताचे मार्ग हे सम्म्यक स्त्री सौख्याचे वाटतात.

## भटके–विमुक्त स्त्रीयांच्या परिवर्तनातील गृहित सत्य

**म. फुले, डॉ. आंबेडकर यांच्या विचारांचे पाईक होऊन मानव मुक्तीसाठीची सर्व अधिकार आत्मसात करणे, उपजीविकेसाठीची भटकंती थांबवणे, जातियतेची सार्थ गुलामगिरी ठुकारून धर्मांतरा नंतर एका मोठ्या समुहाला बुद्धांच्या सम्म्यक विचारावर मार्गक्रमण केले पाहिजे.** पुरोगामी महाराष्ट्रामध्ये स्त्रियांच्या बाबतीत वेगळ्या पातळीवर

ISBN 978-93-342-3008-6

अनेक स्थित्यांतरे घडून आलेत. त्यामध्ये जाती–पातीच्या पलीकडे जाऊन अंतरजातीय अंतर + धर्मीय झालेले विवाह होय. ज्या महाराष्ट्रात ऐकाळी दलितांची सावली सुद्धा निषीद्ध मानली जायची. त्या समाजातल्या व इतर समाजामध्ये झालेले हे विवाह पुरोगामी महाराष्ट्रात स्तुत्यंतच ठरले. केवळ प्रबोधनाची क्रांती समाज्याचे परितर्वन त्याला आले. आत्मभान येण्यासाठी भटकंती थांबवणे व सन्मानाचे जीवन जगणे, समाज स्त्री स्थीर नसल्याने पावलोपावली उद्धवस्त आणि वाईट विकृती सहन कराव्या लागत.

या धर्माच्या चुकीच्या समजुतीने स्त्रीला परिघा बाहेर टाकुन हिनतेची वागणूक दिली ती जात पंचायत समपुष्टांत आणणे माढा जेजुरी या गावातील जात पंचायत प्रथा बंद करणे, त्यामुळे तीला आत्मीकबळ प्राप्त होईल. दुर्देवाने स्त्रीया ही स्वत:कडे समाजाच्या उपेक्षेनुसारच बघतात. स्त्रीला हातबल आणि दुबळी करून ठेवलेल्या सर्व जाती व्यवस्था नष्ट करणे.

स्त्रियांच्या सामाजिक उत्थापन होऊन त्याच्या जीवनात अनुकूल बदल घडून यावेत, स्त्रीयांनी आपल्या अन्यायाचा प्रतिकार निकराने करावा, स्मशानजोगी डक्कलवार या जमातीतील लोक अद्यापही या परंपरेतुन बाहेर पडलेले नाहीत. आत्मभान आलेल्या आणि फुले आंबेडकरांच्या विचाराची नैतिकतेने स्वाधीन झालेल्या समाजाची पावले शिक्षणाकडे वळली आहेत. हि पावल प्रयत्नपूर्वक पुढे जाण्याची गरज आहे. भविष्यात शाळेकडे वळणारी हीच पावलं आशा जमातीला किंवा समाजाला जात परंपरेतून आणि धर्मांध अंधश्रद्धेतून बाहेर काढु शकेल असा विश्वास आहे. गावो–गाव भटकंती आणि दारोदार भीक मागत जगण्यापेक्षा सन्मानाने स्वत:चा वेगळा व्यवसाय व शिक्षण घेतले तर त्यांच्या आयुष्यातील हा कृतिकारक बदल म्हणावा लागेल. भटक्या–विमुक्त बहुजन समाजात झालेला हा बदल केवळ आंबेडकरांच्या विचारामुळेच झाला आहे. त्यांना त्याच्या आस्तीत्वाची आणि सामाजिक गुलामगिरीची जाणिव करून जागृती घडविणे आणि माणूस म्हणून जीवन जगण्याचे बळ देणे इतकतेच ......!

## संदर्भ ग्रंथ

१. संपा. पाणसे रमेश, महाराष्ट्रातील समाज परिवर्तनाच्या दिशा, मॅजीस्टीक प्रकाशन, जुन १९८९

२. खेरेमोडे, डॉ. भिमराव रामजी आंबेडकर, चा. भ. महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, प्र. आ. १९८५

३. संपा. पवार दया, डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई. प्र. आ. १९९३

४. रानडे प्रतिभा, स्त्री प्रश्नांची चर्चा, पॉप्युलर प्रकाशन, १९९१.

५. नरे-पवार, संध्या य.दि. फडके, बहुजन स्त्रीचे वर्तमान प्रगत संशोधन केंद्र मनोविकास प्रकाशन, जुलै २०१२.

६. गरूड श्यामल, दलित स्त्रीयांची आत्मकथने, यशश्री ३०, पुणे, डिसेंबर २०१०.

७. चव्हाण रामनाथ, भटके-विमुक्त समाज आणि जात पंचायत, भाग ४, १.

**प्रा. डॉ. गोवर्धन कृष्णाहरी दिकोंडा**
सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभाग
कला व वाणिज्य महाविद्यालय, माढा
ता. माढा, जि. सोलापूर.
मोबाईल – 9021207336
ईमेल – govardhan.docs@gmail.com

# भारतातील डाक व्यवस्था : इसवी सन पूर्व ६ वे शतक ते इसवी सन १९५०

**गोषवारा :**
भारतात डाक व्यवस्था प्राचीन काळात अत्यंत आवश्यक असेल अशीच होती. प्राचीन काळात सद्यस्थितीत जसे या देशावर एक छत्री अंमल आहे तसे नसल्यामुळे डाक व्यवस्था कायमस्वरूपी निर्माण केले नसल्याचे दिसून येते. मध्ययुगीन काळात मुघलांचे एक छत्री अंमल स्थापन होण्यापूर्वी आवश्यक असेल अशीच डाक व्यवस्था होती. मुघल राज्यकर्ते भारतावर एक छत्री अंमल स्थापन केले असले तरी डाक व्यवस्थेचे सुसूत्रीकरण केले नव्हते तसेच सर्व सामान्य नागरिकांना सहजपणे डाक पाठवता येईल अशी व्यवस्था उपलब्ध करून दिली नव्हती. ईस्ट इंडियाच्या काही अधिकाऱ्यांनी या देशावर हळूहळू एक छत्री अंमल प्रस्थापित केली. त्यांनी डाक व्यवस्थेत सुसूत्रता आणली आणि डाक व्यवस्थेत कायदेशीर प्रक्रिया आणून डाक व्यवस्थेचे विविध कायदे पारित करून सर्व सामान्य नागरिकांना डाक व्यवस्थेत सामावून घेतले.

सूचनक शब्द - Key Words – स्टॅम्प, पोस्ट, विमा, अश्व, सराई, धावपटू

## भारतातील डाक व्यवस्था : इसवी सन पूर्व ६ वे शतक ते इसवी सन १९५०


**प्रस्तावना**

पत्र पाठवणे आणि स्वीकारणे तथा एकमेकांना पत्र व्यवहार करणे आज कोणत्याही देशातील नागरिक सहज सुलभपणे करत आहे. पत्रव्यवहार आज कागदी स्वरुपातही केला जातो तसेच ईलेक्ट्रोनिक्स म्हणजे ई-मेल च्या माध्यमातूनही केला जातो. प्राचीन काळापासून ते आजअखेर डाक तथा पत्र व्यवहारात आणि व्यवस्थेत मोठ्या प्रमाणात बदल झालेला दिसून येतो. त्यामुळे डाक व्यवस्थेवर संशोधकीय दृष्टीने प्रकाशझोत टाकणे आवश्यक आहे. विशेषत: भारतीय डाक व्यवस्थेचे ऐतिहासिक अभ्यास करणे आवश्यक वाटते.

**प्राचीन भारतातील डाक व्यवस्था**

भारताचा प्राचीन काळ हा इसवी सन पूर्व ६ वे शतक पासून ते इसवी सन १२ वे शतक पर्यंत मानले जाते. या कालावधीत भारतात लेखन साहित्य आणि साधनांचा विचार केला असता साधारणपणे दगड, विटा, पाने, लाकूड, भूर्जपत्र, लोह, सोने, चांदी, कापड यांचा मोठ्या प्रमाणात वापर केलेला दिसून येतो. तत्कालीन काळात भारतात कागदाचा उत्पादन होत होती किंवा नाही याबाबत अधिकृत असे माहिती मिळत नाही. परंतु कागदाच्या संदर्भात संशोधन करणारे प्रा. पी. जी. गोसावी यांनी त्यांच्या लेखात काश्मीर खोऱ्यात सोगाडियन पत्रे जागतिक संशोधक अर्नेस्ट स्टाईन यांना प्राप्त झाल्याचे उल्लेख केला आहे. थोडक्यात प्राचीन काळात कागदाचा वापर होता असे दिसून येते. परंतु दगड, विटा, पाने, लाकूड, भूर्जपत्र,लोह, सोने, चांदी, कापड आणि कागद हे कितपत पत्रव्यवहार करणेसाठी उपयोगात आणले जात होते[१] तसेच एका ठिकाणावरून दुसऱ्या ठिकाणी संदेश वहन कसे होत होते याचे स्वतंत्रपणे संशोधन करणे आवश्यक वाटते.

उपलब्ध माहिती नुसार प्राचीन काळात राज्यकर्ते, सामंत, मंडलिक, मोठ मोठे जमीनदार यांनी त्यांच्या त्यांच्या प्रदेशात काय काय चालत आहे. याचे प्रत्येक क्षणाचे बित्त बातमी समजून घेणेसाठी त्यांनी त्यांचे संदेश पोहोच करणेसाठी आणि स्वीकार करणेसाठी स्वतंत्र यंत्रणा उभी केली होती. त्यांनी त्या संदेश वाहकांना संदेश स्वीकारणे आणि पोहोच करणे बाबत प्रशिक्षण दिलेले असायचे त्यामुळे पत्रव्यवहार करणे सोपे होत होते. मानवी संदेश वाहक व्यतिरिक्त प्राचीन काळात कबुतरांचा वापर संदेश वहन किंवा पत्रव्यवहार करणेसाठी करत होते. याकरिता कबुतरांनाही प्रशिक्षण दिले जात असल्याचे दिसून येते. याशिवाय संदेश वाहक आपले कर्तव्य प्रामाणिकपणे पार पाडत होते किंवा नाही यासाठी त्यांच्यावर देखरेख करणेसाठी स्वतंत्र गुप्तहेरची व्यवस्था केलेली होती.[२]





**प्राचीन ते मध्ययुगीन काळात डाक तथा पत्र पोहोच करणारे धावपटू**

**मध्ययुगीन कालीन डाक व्यवस्था**

मध्ययुगीन काळात जागतिक स्तरावर कागदाचा उत्पादन मोठ्या प्रमाणात सुरू झाल्याने मध्ययुगीन भारतात कागदाचा वापर सुरू झाला. भारतात विविध प्रांतात वेगवेगळया राज्यकर्त्यांनी त्यांना आवश्यक असे कागदाचे उत्पादन केंद्र सुरू केले. यामुळे तत्कालीन भारतात सर्व सामान्य नागरिकांना सहजपणे कागद उपलब्ध होत होता. कागदाच्या सहज उपलब्धतेमुळे काही नागरिक शिक्षित झाले. कागदाची उपलब्धता आणि सुशिक्षितपणामुळे मध्ययुगीन काळात पत्र व्यवहार कागदावर सुरू झाली.

बाबरने मुघल सत्ता प्रस्थापित स्थापना केल्यानंतर बाबरला सातत्याने त्याच्या मूळ गावाशी म्हणजे काबूल शहराशी संपर्क साधणे आवश्यक होते. त्यामुळे बाबरने आग्रा ते काबूल पत्रव्यवहारासाठी रोड बांधून घेतला. प्रत्येक ३६ मैल अंतरावर म्हणजे ५८ किलोमीटरच्या अंतरावर पत्रव्यवहार करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी विश्रांतीचे स्थानक उभी केली होती. याठिकाणी सहा अश्व आणि तीव्र गतीने पळणारे आणि धावणारे कर्मचारी पत्र व्यवहारासाठी तैनात ठेवले होते. यासाठी दिवाण-ए-इन्शा या विभागांतर्गत दरोगा-ए-डाक चौकी नावाने पोस्टल अधिकारांसाठी स्वतंत्र विभाग सुरु केले.[३]

बाबरच्या नंतर शेरशहा सुरीने भारतावर केवळ पाचच वर्षे राज्य केले, पण शेरशहाच्या सुरीच्या प्रदीर्घ प्रशासकीय अनुभवामुळे शेरशहा सुरीने भारतातील प्रशासकीय व्यवस्थेत मोठ्या प्रमाणात सुधारणा घडवून आणली. म्हणून पुढील काळात सम्राट अकबराला शेरशहाचा प्रशासकीय वारसदार ओळखले जाते. शेरशहाने त्याच्या कारकिर्दीत पत्र व्यवहार स्वीकारणे आणि पोहोच करणे व्यवस्थेत मोठ्या प्रमाणात सुधारणा केली. त्यांनी कलकत्ता ते काबूल असा २५०० किलोमीटर ग्रँट ट्रंक रोड बांधून घेतला. प्रत्येक दहा किलोमीटर अंतरावर रस्त्याच्या कडेला पत्र व्यवहार करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी सराई म्हणजे विश्रांती गृह स्थापन केले. तसेच या ग्रँट रोडवर ३४०० अश्व आणि बातमी तथा पत्र पोहोच करणारे कर्मचारी तैनात ठेवले होते.[४]




**शेरशहा सुरी यांनी कोलकत्ता ते काबूल असे २५०० किलोमीटरचे बांधलेले ग्रँट ट्रंक रोड**

**ब्रिटीश काळातील डाक व्यवस्था**

ब्रिटीशांनी भारतात डाक व्यवस्थेमध्ये आमूलाग्र बदल केला. ईस्ट इंडिया कंपनीने भारतात इसवी सन १७२७ मध्ये पहिले पोस्ट ऑफिस उघडले. इसवी सन १८५२ मध्ये पहिले कागदी स्टॅम्प ब्रिटीशांनी सिंध प्रांतात अंमलात आणला. त्यावर 'सिंध डिस्ट्रिक डाक' असा उल्लेख आहे. EIC म्हणजे ईस्ट इंडिया कंपनी आणि 4 आणे असा उल्लेख आहे.[५]



**इसवी सन १८५२ मध्ये भारतातील पहिले कागदी पोस्ट स्टॅम्प**

ब्रिटीशांचा भारतातील पहिला गव्हर्नर रॉबर्ट क्लाईव यांनी भारतात नियमित व अखंडपणे चालणारे पोस्टल व्यवस्था उभी केली. इसवी सन १७७४ मध्ये वॅरन हेस्टिंग्ज यांनी पोस्ट कार्यालयांची संघटनात्मक व्यवस्था लावून घेतली. त्यानंतर बंगाल, मद्रास आणि मुंबई प्रांतात जनरल पोस्ट ऑफिस म्हणजे GPO नांवाने पत्र व्यवहाराचे मुख्य कार्यालये स्थापन केली. इसवी सन १८५० ला पोस्ट व्यवस्थेत सुधारणा होणेसाठी पोस्ट ऑफिस कमिशन म्हणजे आयोगाची नेमणूक केली. आयोगाच्या सूचनेनुसार भारतात पत्र व्यवहाराला कायदेशीर स्वरूप देऊन इसवी सन १८५४ मध्ये पोस्ट ऑफिस ॲक्ट कायदा पारित केला. इसवी सन १८६० मध्ये पत्र व्यवहार संदर्भात मार्गदर्शक सूचना व नियमावली म्हणून पोस्ट मन्यूअल प्रकाशित केली. इसवी सन १८७३ मध्ये प्रिंट केलेले पोस्ट लिफाफा विक्रीसाठी उपलब्ध करून ठेवले. इसवी सन १८७६ मध्ये भारतीय पोस्ट ऑफिस जागतिक पोस्टल युनियनमध्ये सहभागी झाले. यामुळे भारतातील पत्रव्यवहार जगात कोणत्याही ठिकाणी होण्यास सुलभ झाले. इसवी सन १८८० मध्ये पोस्ट कार्ड सेवा, मनी ऑर्डर सेवा आणि रेल्वे द्वारे पत्र व्यवहार पोहोच करण्याचे सेवा सुरू झाले. त्यानंतर कालांतराने इसवी सन १८८४ मध्ये पोस्टल जीवन विमा सुरू केली, इम्पेरिकल पोस्ट स्टॅम्प सुरू झाली. इसवी सन १८८६ मध्ये आर्थिक व्यवहारासाठी रिव्हेनू स्टॅम्प विक्रीसाठी सुरू केली. इसवी सन १८९८ मध्ये पुनः पोस्ट ॲक्ट पारित केले. दि. १ फेब्रुवारी १९०१ पासून भारतीय नागरिकांना पोस्ट तिकीट विक्रीसाठी उपलब्ध करून दिले.[६]




**ब्रिटीश एक पेनी किंमतीचे पोस्टेज स्टॅम्प विक्रीसाठी उपलब्ध**

इसवी सन १९३५ मध्ये आयपीओ सुरू केले. इसवी सन १९४७ साली भारत स्वतंत्र झाल्या प्रित्यर्थ भारत स्वतंत्र झाल्याचे स्टॅम्प प्रसिद्ध केले.




**स्वतंत्र भारताचे पहिले भारतीय पोस्ट तिकीट**

**संशोधन पद्धती**

उपरोक्त संशोधन लेखासाठी पुराभिलेख संशोधन पद्धतीचा तथा विश्लेषण व वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा उपयोग करण्यात आलेला आहे. याकरीता प्राथमिक व दुय्यम साधनांचा तसेच मूळ कायद्यांचा अभ्यास केलेला आहे.

**संशोधन आणि चर्चा**

सद्यस्थितीत भारतातील डाक व्यवस्थेत मोठ्या प्रमाणात बदल दिसून येत आहे. डाक व्यवस्थेत पासपोर्ट सेवा, आधार कार्ड सेवा याप्रमाणे बँकिंग सेवा सुरू झालेली आहे. भारतातील डाक व्यवस्था टिकवून ठेवणे आवश्यक असल्याने केंद्र शासन वेगवेगळे योजना आणून डाक व्यवस्था कायम स्वरूपी कसे टिकून राहिल यासाठी मोठ्या प्रमाणात प्रयत्न करत आहे. त्यामुळे प्राचीन काळापासून ते ब्रिटीश काळापर्यंत भारतातील डाक तथा पत्र व्यवहार व्यवस्थेवर प्रकाश टाकणे आवश्यक वाटले. म्हणून प्रस्तुत संशोधक प्राचीन ते ब्रिटीश काळापर्यंतच्या बदलत्या  डाक तथा पत्र व्यवहार व्यवस्थेवर संशोधनात्मक चिकित्सक विवेचन केले आहे.

**निष्कर्ष :**

प्राचीन भारतात कागदाचा सहज उपलब्धता नसल्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना पत्र व्यवहार करणेबाबत बंधने होती. मध्ययुगीन काळात कागदाचा सहज उपलब्धतेमुळे सर्वसामान्य नागरिकांना पत्र व्यवहार करणे सोपे झाले. ब्रिटीश मूळताच त्यांच्या मातृभूमीत म्हणजे लंडनमध्ये लोकशाहीभिमुख शासन व्यवस्थेचे पाईक असल्यामुळे त्यांनी भारतात त्यांचे सत्ता स्थापन केल्यानंतर ब्रिटीश येथील सर्वप्रकारचे प्रशासकीय व्यवस्था भारतात विविध कायदे पारित करून उभी करण्यास आरंभ केला. भारतातही डाक व्यवस्थेबाबत त्यांनी विविध कायदे पारित करून डाक व्यवस्था सर्वसामान्य नागरिकांना उपलब्ध करून दिली. ब्रिटीशांनी डाक व्यवस्थेसोबतच विमा, स्टॅम्प विक्री व इतर सेवा आणून डाक व्यवस्था मजबूत केले.

**संदर्भ :**


१. दिकोंडा गोवर्धन, अप्रकाशित प्रबंध पश्चिम भारतातील लेखन व कागद यांचा इतिहास – इसवी सन १६०० ते इसवी सन १८६०, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

२. https://www.indiapost.gov.in/VAS/Pages/PostalHistory.aspx, दिनांक ३ सप्टेंबर २०२२ सकाळी वेळ ११.१० वा.

३. डॉ. अंशू त्यागी आणि डॉ. बबीता त्यागी, ‘Postal Communications in Ancient and Medieval India’, International Journal of Education and Science Research and Review, Vol. 1, Issue I, February 2014, pp. 31-39

४. जी. थंगापंडी, अप्रकाशित प्रबंध ‘A Study on Marketing of Postal Services by India Post with references to Salem West Division, पेरियार विद्यापीठ, सालेम

५. एम. नागेश्वर राव, अप्रकाशित प्रबंध, ‘Customer Satisfaction in Postal Services – A Case Study of Prakasham District’, श्री कृष्णदेवराय विद्यापीठ, अनंतपूर

६. https://en.wikipedia.org/wiki/Postage_stamps_and_postal_history_of_India

# भौगोलिक माहिती प्रणालीचे भूगोलातील उपयोजन

प्रा.डॉ. राघवेंद्र ताटीपामूल
सहयोगी प्राध्यापक, भूगोल विभाग
शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय, कळंब
raghavendra268@gmail.com

**गोषवारा**

भूगोल विषयाचा अभ्यास प्राचीन काळापासून केला जात आहे. यामध्ये काळानुसार बदल झाला आहे. भूगोल विषयात काळानुसार नवीन घटकांची भर पडत गेले. भूगोलाचा अभ्यास आधुनिक काळात करत असताना, नवीन तंत्रज्ञानाचा वापर होऊ लागला. याचाच एक महत्त्वाचा भाग म्हणून भौगोलिक माहिती प्रणालीचा वापर होऊ लागला. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये भौगोलिक माहिती प्रणालीचा उपयोजन भूगोल विषयात कसा होतो, यावर लक्ष केंद्रित केले आहे. भौगोलिक माहिती प्रणालीचे उपयोजन विविध क्षेत्रात होते. जसे की, वनसंपदा व्यवस्थापन, लोकसंख्या अभ्यास, जलसंपदा वितरण, मृदा वितरण, आपत्ती व्यवस्थापन, कृषी भूमी उपयोजन, वाहतूक व्यवस्थापन, पाणलोट क्षेत्र विकास अभ्यास, नगरारचना, शहर विस्ताराचा अभ्यास, भूरूपशास्त्र, हवामानशास्त्र, सागरशास्त्र, आरोग्य सुविधा वितरण व व्यवस्थापन इत्यादी. भौगोलिक माहिती प्रणाली हे संगणकीय प्रणाली असून सुदूर संवेदनाद्वारे प्राप्त होणाऱ्या माहितीच्या आधारावर प्रक्रिया करून नकाशा बनविणे, माहिती प्रक्षेपित करणे, संभाव्य धोक्याची पूर्वकल्पना देणे अशा विविध प्रकारे उपयुक्त ठरते.

**बीज संज्ञा :-** भौगोलिक माहिती प्रणाली, सुदूर संवेदन, आपत्ती व्यवस्थापन, माहिती व्यवस्थापन, भौगोलिक स्थान निश्चिती

## प्रस्तावना

मानवाच्या विकासासोबतच मानवी ज्ञानात काळानुसार भर पडत गेले. आधुनिक काळात रेल्वे, टीव्ही, रेडिओ, मोबाईल, संगणक इत्यादी तंत्राचा विकास झाला. भूगोलामध्ये सांख्यिकीय माहिती, सर्वेक्षण, नकाशा तयार करणे यासारख्या घटकांचा अभ्यास करताना संगणक प्रणालीचा वापर केला जातो. मागील दोन दशकांमध्ये संगणक शास्त्रातील प्रगती, अंकीय नमुन्यात उपलब्ध होणाऱ्या सांख्यिकीतील वाढ, सांख्यिकीचे संग्रहण, सर्वेक्षण, दूर संवेदन, सांख्यिकी तंत्रज्ञान व्यवस्थापनातील प्रगती मधून भौगोलिक माहिती प्रणालीचा विकास झाला. 1960 नंतर भूगोलात नकाशा तंत्रज्ञानात संगणकाद्वारे डिजिटल नकाशे तयार केले जाऊ लागले. भौगोलिक माहिती प्रणाली ही पृथ्वीच्या स्थानासंदर्भात असलेली प्रणाली होय. या प्रणालीला इंग्रजीमध्ये Geographical Information System (GIS) असे म्हणतात. यालाच संक्षिप्तपणे जीआयएस (GIS) असेही संबोधतात.

नकाशा बरोबर घटकांच्या गुणवैशिष्ट्यांची माहिती देण्याची प्रणाली कॅनडात विकसित करण्यात आले. डॉ. रॉजर टॉमलिन्सन यांनी कॅनडियन भौगोलिक माहिती प्रणाली तयार व विकसित केली. या प्रणालीमध्ये आच्छादन, मोजमाप, डिजिटायझेशन करण्याची क्षमता होती. या कार्यामुळेच डॉ. रॉजर टॉमलिन्सन जीआयएस चे पितामह म्हणून ओळखले जाते.

पृथ्वीवरील विविध ठिकाणांच्या माहितीचे वर्णन करणाऱ्या सांख्यिकीची साठवण करणारे व त्या सांख्यिकीचे उपयोजन करणारी जीआयएस ही संगणक प्रणाली आहे. (ऱ्हिंड १९८९)

विशिष्ट उद्दिष्टे व वस्तूच्या पूर्ततेसाठी एखाद्या भौगोलिक प्रदेशासंबंधी, अवकाशित माहितीच्या नोंदी, संस्करण, साठवण, गरजेनुसार पुनर्प्राप्तीकरण, रूपांतरण आणि सादरीकरण करणाऱ्या साधनांचा संच म्हणजे भौगोलिक माहिती प्रणाली होय. (बरो १९८६)

## उद्दिष्टे

प्रस्तुत लेखात खालील उद्दिष्टांचा अभ्यास समाविष्ट आहे.

१. भौगोलिक माहिती प्रणाली संकल्पना अभ्यास करणे.

२. भौगोलिक माहिती प्रणालीचे भूगोलातील उपयोजनाचा अभ्यास करणे.

## माहिती स्त्रोत व संशोधन पद्धती

प्रस्तुत लेखात माहिती मिळविण्यासाठी विविध संदर्भ ग्रंथ, नियतकालिके, इंटरनेटवरील माहितीचा उपयोग केला आहे. या संशोधन लेखाचा अभ्यास करताना वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब केला आहे.

## भौगोलिक माहिती प्रणालीचे भूगोलातील उपयोजन

विज्ञान युगात संगणकाच्या विकासाबरोबरच भौगोलिक माहिती प्रणालीचा वापर व विकास वाढत गेला आहे. माहिती तंत्रज्ञान युगात संगणकावर आधारित व्यवस्था सर्व स्तरात निर्माण झाले आहे. स्थानिक प्रशासन, वाणिज्य, व्यापार, सेवा, संशोधन, आपत्ती व्यवस्थापन, नियोजन व समस्या उकल यासाठी जीआयएस चे उपयोजन दिवसेंदिवस वाढत आहे. जीआयएस चे उपयोजन भूगोलात व इतरही ज्ञानशाखेत विविध प्रमाणे केले जाते.

### १. नकाशाशास्त्र

भूगोलाचा अभ्यास नकाशा शिवाय होऊ शकत नाही. नकाशाचा उगम प्राचीन काळात झाला असला, तरी संगणक व भौगोलिक माहिती प्रणालीमुळे शास्त्रशुद्ध, अचूक व कमी कालावधीत नकाशा तयार करता येतो. ज्यावेळेस मुळे नकाशा हा डिजिटल स्वरूपात उपलब्ध झाल्यामुळे, त्याच्यावर

पुनर्प्रक्रिया, साठवण व रूपांतरित करता येणे सोपे झाले आहे. जीआयएस चा नकाशातील सर्वात महत्त्वाचा उपयोग म्हणजे अतिशय अल्पकाळात प्रमाणबद्ध, रंगीत व अगणित नकाशे उपलब्ध होतात.

**२. भूरूपशास्त्र**

उपग्रह छायाचित्रांवर जीआयएस मध्ये प्रक्रिया करून भूरूपांचे वर्गीकरण, भूरूपांचे नकाशे तयार करता येते. भूरूपकीय प्रक्रिया जसे क्षरण, वहन, संचयनाचे स्वरूप, प्रमाण, भूरूपातील बदलांचा अभ्यास, जी आय एस द्वारे शास्त्रीय पद्धतीने करता येतो. भूघसरण, भूमिपात सारख्या आपत्तींचा शक्यतांची पूर्वकल्पना, हिमनदीय भूरूपांचे नकाशे तसेच तटिय भूरूपशास्त्रातील किनारपट्टीचे बदलते प्रारूपांचा अभ्यास जीआयएसद्वारे प्रामुख्याने केला जातो.

**३. हवामान शास्त्र**

हवामान शास्त्र विषयात अभिक्षेस्त्रीय प्रारूपांचा अभ्यास जीआयएसने प्रामुख्याने केला जातो. विविध भौगोलिक क्षेत्रातील हवामान विषयक माहितीचा तुलनात्मक अभ्यास जीआयएस द्वारे शास्त्रीय पद्धतीने करता येतो. हवामान बदलाचा जैवविविधतेवर झालेला परिणामाचा शोध जीआयएस द्वारे घेतला जातो.

**४. सागर शास्त्र**

सुदूर संवेदनाद्वारे समुद्रतळाचा उपग्रह छायाचित्रवर जीआयएस ने प्रक्रिया करून प्रत्यक्षात समुद्रात न जाता अचूक नकाशे तयार करता येतो. जीआयएसमुळे समुद्र तळातील भूरूपे, समुद्र प्रवाह, तळरचना, तटिय भूरूपांचा किनारपट्टीचे प्रारूप, सागर जल पातळीचा शास्त्रीय अभ्यास करून संभाव्य धोके टाळता येतात.

**५. नागरी भूगोल**

नागरी भूगोलात शहरी भूमी उपयोजन, शहरी विस्तार, प्रसरण, प्रभावक्षेत्र यांचा अभ्यास अचूकपणे करण्यासाठी उपग्रह छायाचित्रांचा वापर करून जीआयएस द्वारे व्यक्त करता येतो. जीआयएस द्वारे शहरी प्रसरणाच्या सीमा निश्चितीचे नकाशे अचूकपणे अत्यंत कमी कालावधीत तयार करता येते. नगर नियोजनासाठी शहराची अंतर्गत संरचना, शहर ग्रामप्रभावक्षेत्राचा अभ्यास जीआयएसमुळे नकाशात स्पष्ट करता येते.

**६. पर्यावरण भूगोल**

पर्यावरणीय घटकाचा अभ्यास करताना पर्यावरण प्रदूषण एक गंभीर समस्या निर्माण झाली आहे. जीआयएस प्रणालीचा वापर करून दूषित पाण्याचे व दूषित मृदेचे नकाशे तयार करून पर्यावरण समस्यांची

तीव्रता कमी करता येते. जीआयएस विश्लेषणाच्या आधारे माती प्रदूषण ठिकाण, दूषित पाण्याचे ठिकाणे यांचे नकाशे तयार करून निरीक्षण केले जाते.

**७. भूगर्भीय नकाशे**

भूगर्भीय अभ्यास करताना अंतर्गत खडक रचना, खनिज वितरण, नैसर्गिक वायूचे साठे, खनिज तेलाचे साठे यांचे जीआयएस सॉफ्टवेअरद्वारे समोच्च रेषांचे नकाशे तयार केले जातात. या नकाशांचा वापर करून खाणकाम व्यवसाय व खनिजांचे साठे शोधण्यासाठी केला जातो.

**८. वाहतूक भूगोल**

वाहतूक भूगोलामध्ये रस्ते वाहतूक, रेल्वे वाहतूक मार्गाचा अभ्यास करताना ,वाहतूक सेवा प्रभाग क्षेत्राचा अभ्यास, वाहतूक नियंत्रण प्रणाली, रस्त्यांचे, रेल्वे वाहतुकीचे जाळे यांचे नकाशे जीआयएस द्वारे तयार केले जाते. याचा फायदा वाहतूक नियंत्रणासाठी, आपत्ती व्यवस्थापनासाठी व संशोधनासाठी केला जातो.

**९. आपत्ती व्यवस्थापन**

आज-काल अवेळी अनेकविध नैसर्गिक आपत्ती येतात. त्यामुळे जीवित व वित्तहानी मोठ्या प्रमाणात घडून येते. भूकंप, ज्वालामुखीचा उद्रेक, महापूर, भूमिपात इत्यादी नैसर्गिक आपत्तीची तीव्रता जीआयएसमुळे कमी करता येते. नदीच्या पाणलोट क्षेत्रातील पर्जन्याचे मोजमाप करून पाण्याची पातळी किती वाढू शकते, तसेच कोणत्या भागात महापूराचे पाणी पोहोचू शकते, याची पूर्वकल्पना जीआयएस प्रणालीमुळे मिळू शकते. भूकंपप्रवण क्षेत्राचे नकाशे, ज्वालामुखी उद्रेकाचे प्रभावक्षेत्र नकाशे, भूमिपात प्रभावक्षेत्राचे नकाशे बनवून त्याद्वारे संभाव्य धोक्याची कल्पना देता येऊ शकते.

**१०. कृषी भूगोल**

कृषी हा मानवाचा पारंपारिक व्यवसाय आहे. भारतासारख्या कृषी प्रधान देशात बहुतांश लोक शेती व्यवसायात गुंतलेले आहेत. भौगोलिक, आर्थिक, सामाजिक परिस्थितीनुसार शेतीचा प्रकार, उद्देश यामध्ये भिन्नता आढळते. देशाचा आर्थिक विकास व लोकसंख्या यावर देशातील कृषी उत्पादन, कृषी भूमी उपयोजन अवलंबून असते. कोणता प्रदेश हा शेतीसाठी, पिकांसाठी उपयुक्त आहे, तसेच उपग्रह छायाचित्रांचा वापर करून कृषी उत्पादन किती होईल याची माहिती जीआयएसमुळे मिळविता येते. भूमी उपयोजनाचा अभ्यास करताना विशिष्ट जमीन, विशिष्ट पिकांसाठी किंवा घटकांसाठी वापरले तर जास्त उपयुक्त ठरते हे, जीआयएसमुळे ठरविता येणे शक्य आहे. कृषी भूमी उपयोजन, नगर भूमी उपयोजन, प्रदेशाचे प्राकृतिक रचना याचे अचूक नकाशे जीआयएस द्वारे तयार करता येते.

### ११. आरोग्य भूगोल

आरोग्य भूगोलात भौगोलिक परिस्थितीनुसार उद्भवणारे रोग याचा अभ्यासासोबतच आरोग्य सुविधांचा भौगोलिक विश्लेषण यामध्ये केला जातो. विशिष्ट प्रदेशात विशिष्ट आजार उद्भवतात. जसे विषुववृत्तीय प्रदेशात मलेरिया सारखे रोग उद्भवतो. रोगाचे प्रादेशिक वितरण, स्वास्थ्य व मानवी आरोग्य साधने, आरोग्य सेवा केंद्र यांची माहिती जीआयएस द्वारे पुरविता येते. जीआयएस प्रणाली द्वारे रोगराईचे व्यवस्थापन, नियंत्रण ठेवण्यास मदत होते.

### १२. प्रशासन

सध्याच्या युगात प्रत्येक प्रशासकीय स्तरावर विविध कामे करावी लागतात. विविध प्रकारची माहिती सर्वेक्षणाद्वारे गोळा करणे, साठवून ठेवणे, पुनर्प्रस्थापित करणे, नकाशे तयार करणे यासारख्या विविध क्रिया या गाव, तालुका, जिल्हा, राज्य व देशपातळीवरील प्रशासकीय स्तरावर जीआयएसचा वापर करून नागरिकांना जास्तीत जास्त सुविधा पुरविण्या साठी व माहिती देण्यासाठी याचा वापर प्रामुख्याने केला जातो.

### निष्कर्ष

भूगोलाचा अभ्यास पारंपारिक साधना बरोबर आधुनिक तंत्रज्ञान व साधनांच्या साह्याने केला जात आहे. यामध्ये सुदूर संवेदन व भौगोलिक माहिती प्रणालीचा प्रामुख्याने समावेश होतो. भौगोलिक माहिती प्रणाली चे भूगोलाच्या प्रत्येक क्षेत्रात उपयोजन होते.

१. जीआयएस तंत्रज्ञान माहिती गोळा करणे, साठवून ठेवणे यामध्ये मोलाची भूमिका बजावते.
२. जीआयएसमुळे कृषी भूमी उपयोजन, नगर नियोजन, वाहतूक जाळे, शहर विस्तार, आरोग्य सुविधा इत्यादी विविध प्रकारचे अचूक नकाशे शास्त्रीय पद्धतीने बनविता येते.
३. जीआयएसमुळे वेळेचे मोठ्या प्रमाणात बचत होते.
४. जीवित व वितहानी कमी करण्यास जीआयएस ची मोठी मदत होते.
५. जीआयएस चा वापर संशोधनात व नकाशा शास्त्रात मोठ्या प्रमाणात होत आहे.

**संदर्भ ग्रंथ :**

1. Burrough P.A, Mcnonnel R.A. and Lloyd C.D (2015)., Principals of GIS, Oxford university press, UK,.
2. Chang kang-tsung, (2006)"Introduction Geographic Information System, Tata McGraw-Hill publication, New Delhi.
3. Joseph George and C.J.Jaganathan,(2018)Fundamentals of Remote Sensing, university press, Hyderabad.
4. Reddy Anji, (2009) "Remote sensing and Geographical information system. BS publication, Hyderabad.
5. Sharma V.K.: Use of GIS-related Technologies for Managing Disasters in India: An Overview: GISdevelopment.net
6. Sharma, A.K. (2008): Landslide and its Mitigation for Disaster Management Using Remote Sensing and GIS Technique – A Case Study of Gangtok Area, East Sikkim: Sikkim Manipal University of Health, Medical and Technological Sciences.
7. Woodhouse J.H.,"Introduction to Microwave Remote Sensing", CRC publication, 2009.
8. कार्लेकर श्रीकांत (2007) भौगोलिक माहिती प्रणाली डायमंड पब्लिकेशन पुणे
9. कार्लेकर श्रीकांत (2016) दूर संवेदन डायमंड पब्लिकेशन पुणे.
10. कार्लेकर श्रीकांत (2015) दूर संवेदन आणि भौगोलिक माहिती प्रणाली जनरिक पब्लिशर्स पुणे
11. पौळ परमेश्वर आव्हाड बालाजी (2012) भौगोलिक माहिती प्रणाली विद्या बुक्स पब्लिशर्स औरंगाबाद.

ISBN: 978---93-34-2-3-0
9 789334 230086

कागद प्रकाशन

₹ १००/-